७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. १२ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com  www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १०७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये




# महात्मा फुलेंच्या द्विशताब्दी वर्षाचा खानवडीतून ऐतिहासिक शुभारंभ

## ‘ज्योती-सावित्री’ सामाजिक परीवर्तनाचे केंद्र : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : अजितदादांच्या दूरदृष्टीचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

### मान्यवरांच्या मांदियाळीत फुले दांपत्याला 'भारतरत्न' देण्याची मागणी

सासवड (दै. संध्या)

"क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाची सुरुवात त्यांच्या मूळ गावातून करणे ही त्यांना खरी मानवंदना आहे. दिवंगत लोकनेते अजितदादा पवार यांच्या पुढाकाराने खानवडी येथे उभारलेली 'ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळा' ही केवळ एक वास्तू नसून फुले दांपत्याच्या विचारांचे जिवंत स्मारक आहे," असे गौरवपूर्ण प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त खानवडी येथे शनिवारी (दि. ११) पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित ज्योती सावित्री शाळेच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी दिवंगत लोकनेते अजितदादा पवार यांनी या शाळेसाठी दिलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, महात्मा फुले हे उत्कृष्ट शेतकरी आणि बांधकाम व्यावसायिकही होते. मुंबई महापालिका, येरवडा जेल आणि कात्रज बोगदा यांसारखी बांधकामे त्यांच्या दूरदृष्टीचे पुरावे आहेत. आज या शाळेत मुलींचा आत्मविश्वास पाहून सावित्रीबाईंच्या कार्याची प्रचिती येते. पुणे जिल्हा परिषदेने 'इंडस्ट्री ४.०' अंतर्गत १०० शाळांत प्रगत प्रयोगशाळा दिल्या असून, हा उपक्रम आता राज्यभर राबविला जाईल. तसेच तरुणांसाठी १,००० नवीन कौशल्य विकास केंद्र उभारली जातील. लोकसभा आणि विधानसभेत महिलांना आरक्षण दिले असले तरी, राजकीय क्षेत्रात महिलांबाबत मानसिकता बदलण्यासाठी महात्मा फुलेंचे विचार आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

उप उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी भाषणात अजितदादा पवार यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. ग्रामस्थांच्या मागणीवरून अजितदादांच्या दूरदृष्टीतून खानवडी येथे 'ज्योती सावित्री सीबीएसई शाळा' साकारली आहे. ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून दादांनी सीएसआर फंड आणि शासकीय निधीच्या माध्यमातून ही भव्य वास्तू उभी केली. ही जिल्हा परिषदेची पहिली सीबीएसई शाळा असून, सध्या २६० विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. भविष्यात १८४० विद्यार्थ्यांची क्षमता आणि निवासी सुविधांसह हे केंद्र परिवर्तनाचे मुख्य स्त्रोत ठरेल. आज ही वास्तू स्त्री सक्षमीकरणाची खऱ्या अर्थाने प्रेरणा देत आहे.

पुढे बोलताना सुनेत्रा पवार यांनी, फुले दांपत्याच्या स्मृती जपण्यासाठी त्यांच्या विविध स्मारकांसह नायगाव येथे उभारण्यात येणारे १०० कोटींचे स्मारक ही पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरतील. या स्मारकांमध्ये महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा सरकारचा मानस आहे. तसेच, खानवडी येथील शाळेत आधुनिक शैक्षणिक सुविधा, क्रीडांगण आणि महात्मा फुलेंच्या जीवन विचारांवर संशोधन केंद्र उभारण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी केली.

मंत्री छगन भुजबळ यांनी महात्मा फुलेंच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, जनतेने त्यांना 'महात्मा' पदवी त्यांच्या कामामुळेच दिली. खानवडी हे गाव आता परिवर्तनाचे केंद्र बनत आहे. नरेंद्र मोदींनी महात्मा फुलेंची देशभर साजरी केलेली जयंती आणि महिलांना लोकसभा आणि विधानसभेतील दिलेले ३० टक्के आरक्षण ही फुले दांपत्याला वाहिलेली खरी श्रद्धांजली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देताना संजय जगताप, अजय इंगळे, रविंद्र फुले

याप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी, फुले दांपत्याला 'भारतरत्न' मिळावा ही संपूर्ण महाराष्ट्राची इच्छा असून, राज्य सरकारने तसा ठराव केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा अशी मागणी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, राज्यात १,००० नवीन कौशल्य विकास केंद्र उभारण्याची घोषणा केली. तसेच पुणे जिल्हा परिषदेच्या धर्तीवर राज्यातील इतर जिल्हा परिषदांमध्येही 'मॉडेल स्कूल' आणि प्रगत प्रयोगशाळा उभारणार असल्याचे स्पष्ट केले.

महात्मा फुलेंनी १८४८ मध्ये मानवी हक्कांची सनद मांडली आणि हंटर कमिशनसमोर सक्तीच्या शिक्षणाची मागणी केली, जो आजच्या 'आरटीई' कायद्याचा पाया ठरला. शिवजयंती उत्सवाचा पाया रचणाऱ्या या महामानवाला त्यांच्या अफाट कार्यामुळेच जनतेने 'महात्मा' ही पदवी दिल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. महात्मा फुले 'जन आरोग्य' योजनेतून रुग्णांना उपचार आणि 'महाज्योती'तून विद्यार्थ्यांना प्रशासकीय अधिकारी बनन्याची आणि करिअरची संधी मिळत आहे. सरकार भिडे वाडा, फुले वाडा व नायगाव येथील स्मारकांचे काम वेगाने पूर्ण करत असून, द्विशताब्दी वर्षानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांतून त्यांचा विचार घराघरांत पोहोचवला जाईल. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी मंत्री जयकुमार गोरे, चंद्रकांत पाटील, अतूल सावे, मंगलप्रभात लोढा, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, दादाजी भुसे, योगेश कदम, खासदार सुप्रिया सुळे, आमदार बापूसाहेब पठारे, राहुल कुल, शंकर मांडेकर, योगेश टिळेकर, माजी आमदार संजय जगताप, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, चंद्रशेखर वढणे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, प्रधान सचिव एकनाथ डवले, रणजित सिंह देओल, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, शिक्षणाधिकारी डॉ भाऊसाहेब कारेकर, संजय नाईकवाडे, सभापती अंकिता पाटील, दिपाली हुलावळे, जितेंद्र बढेकर, अमोल नलावडे, सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, प्राजक्ता दुर्गाडे, रूपाली झेंडे, पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे, सदस्य माऊली यादव, सायली शिंदे सर्व सदस्य, सरपंच, सर्व सदस्य उपस्थित होते. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांनी आभार मानले. खानवडीतील या भव्य सोहळ्याला परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

---

## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### वाघ ‘सोंग’ करतोय!

मुंबई (दै. संध्या) : उद्धवसेनेचे लोकसभेतील ७ खासदार फुटून शिंदेसेनेत दाखल होणार, अशी आठ दिवसांपूर्वी थंडावलेली ‘ऑपरेशन टायगर’ची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. कारण या खासदारांची नुकतीच दिल्लीत बैठक झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या बंगल्यावर दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री सुरू झालेली ही बैठक पहाटेपर्यंत चालली. त्यात पाच खासदार प्रत्यक्ष तर दोघेजण व्हिडिओ कॉलद्वारे सहभागी झाले होते, असे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, उपमुख्यमंत्री शिंदेंनी या बैठकीचे तसेच ऑपरेशन टायगरचे स्पष्ट शब्दांत खंडन केले आहे. त्यामुळे शिवसेनेचे ‘वाघ’ असे संबोधल्या जाणाऱ्या खासदारांच्या ‘शिकारी’साठी कुणी ‘सोंग’ करतोय का, असा प्रश्न राजकीय वर्तुळात विचारला जात आहे. मार्चमध्ये पुन्हा प्रियंका चतुर्वेदींच्या राज्यसभा उमेदवारीसाठी आदित्य ठाकरे अत्यंत आग्रही होते. परंतु, संजय राऊतांनी परस्पर शरद पवारांची उमेदवारी जाहीर करून आदित्यांची कोंडी करून टाकली. त्यानंतर आदित्य यांनी चतुर्वेदींचा आग्रह धरल्याने लोकसभेतील खासदार नाराज असल्याचा सूर उद्धवसेनेच्या गोटातूनच माध्यमांकडे पोहोचवला जात आहे.

---

# महिला व बालविकास विभागात २३ वर्षांनंतर मोठा निर्णय

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील महिला व बालविकास विभागात 23 वर्षांनंतर मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ वाढवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही माहिती दिली असून, या निर्णयामुळे विभागाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासनाने घेतलेल्या या निर्णयानुसार, विभागातील एकूण पदांचा सखोल आढावा घेण्यात आला. यामध्ये काही अनावश्यक



किंवा निष्क्रिय पदे रद्द करण्यात आली आहेत. त्याचबरोबर 165 नव्या पदांची निर्मिती करण्यात आली आहे. या सर्व बदलांनंतर विभागासाठी एकूण 8,669 नियमित पदांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली पदभरतीची प्रक्रिया आता मार्गी लागणार आहे.

---

# छगन भुजबळांच्या हेलिकॉप्टरचा अपघात थोडक्यात टळला

## पायलटने हेलिकॉप्टर नियोजित हेलिपॅड ऐवजी चक्क कार पार्किंगमध्ये उतरवले

पुणे (दै. संध्या)

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरच्या लँडिंगवेळी पायलकडून एक मोठी चूक झाल्याची घटना आज पुण्याच्या पुरंदर तालुक्यात घडली. पायलटने हेलिकॉप्टर नियोजित हेलिपॅडवर उतरवण्याऐवजी चक्क कार पार्किंगमध्ये उतरवले. या घटनेमुळे घटनास्थळी काही वेळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पण भुजबळ हा प्रकार बाजूला सोडून आपल्या नियोजित कार्यक्रमाच्या दिशेने पुढे निघून गेले.

पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज



एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंत्री छगन भुजबळ या कार्यक्रमासाठी हेलिकॉप्टरने आले होते. त्यांचे हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी स्वतंत्र हेलिपॅडची व्यवस्था करण्यात आली होती. पण पायलटचा खानवडी गावातील मोकळी जागाच हेलिपॅड असल्याचा समज झाला आणि त्याने त्या मैदानातच भुजबळांचे हेलिकॉप्टर उतरवले. या मैदानापासूनच काही अंतरावरच हेलिपॅड होते. हेलिकॉप्टर चुकीच्या ठिकाणी उतरल्याचे पाहून तिथे हजर असलेल्या नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकला. पण कोणतीही दुर्दैवी घटना घडली नाही. पोलिसांनी तत्काळ पायलटला योग्य ती माहिती दिली. त्यानंतर हेलिकॉप्टर तेथून हलवण्यात आले. तत्पूर्वी, भुजबळ कारने तेथून कार्यक्रमाच्या दिशेने निघून गेले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पायलटच्या अशाच एका चुकीने विमान अपघातात बळी गेला होता. त्यानंतर छगन भुजबळ यांच्या बाबतीत हा प्रकार घडल्यामुळे रोष व्यक्त केला जात आहे. योग्य नियोजन असतानाही हेलिकॉप्टर चुकीच्या ठिकाणी उतरवणे अत्यंत धोकादायक आहे. विशेषतः लोकवस्तीच्या जवळ अशा प्रकारची चूक मोठ्या अपघातास कारणीभूत ठरली असती, अशी संतप्त भावना या प्रकरणी व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, या घटनेनंतर स्थानिक प्रशासनाने या घटनेची चौकशी सुरू केली आहे. हेलिपॅड आकाशातून स्पष्ट दिसत होते का? पायलटकडून चूक नेमकी कशी व का झाली? काही तांत्रिक अडचण होती का? अशा विविध प्रश्नांची उत्तरे या प्रकरणी शोधली जाणार आहेत.

---

## दै. संध्या अँकर सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा सल्ला; खासदार शरद पवारांवरही साधला निशाणा

# सुनेत्रा पवारांनी सावध रहावे, स्वतःची काळजी घ्यावी

छ. संभाजीनगर (दै. संध्या)

बीड येथील एका व्यक्तीने सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या जिवाला राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यापासून धोका असल्याचा दावा केला आहे. त्यावर मंत्री संजय शिरसाट यांनी सुनेत्रा पवारांनी सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. राजकारणात असा धोका असतो. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनी सावध राहिले पाहिजे. स्वतःची काळजी घेतली पाहिजे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची





घुसखोरी झाल्याचा दावा करणाऱ्या शरद पवारांवरही निशाणा साधला. मंत्री संजय शिरसाट यांनी आज एका वृत्तवाहिनीशी बोलताना विविध विषयांवर भाष्य केले. त्यात त्यांनी सुनेत्रा पवारांविषयी उपरोक्त विधान केले. बीड येथील एका व्यक्तीने भोंदू अशोक खरात प्रकरणात स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीकडे सुनेत्रा पवार यांना रुपाली चाकणकरांपासून धोका असल्याचा दावा केला आहे. आता सुनेत्रा पवार यांच्या जिवाला धोका आहे की नाही हे माहिती नाही. पण त्यांनी सावध राहिले पाहिजे. राजकारणात असा धोका असतो. त्यांनी स्वतःची काळजी घेतली पाहिजे. रुपाली चाकणकर आहे की इतर कुणी हे तपासात समोर येईल, असे ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी झाल्याचे विधान करून एकच खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या या विधानावर राजकीय वर्तुळातून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. संजय शिरसाट याविषयी बोलताना म्हणाले, वारकरी संप्रदायात अनेक जातींचे लोक असतात. त्यात कुणीही एका जातीचा नसतो. त्यामुळे त्याला जातीय बळ देणे हा प्रचार आहे. हिंदू समाजाला डॅमेज करण्याचा प्रयत्न आहे. शरद पवारांनी हिंदू समाजाची ताकद विभागण्याचा प्रयत्न करू नये. त्यात घुसखोरी होईल असे म्हणू नये.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भोंदू अशोक खरातच्या जागी एखादा मुस्लिम व्यक्ती असता तर सर्व मुस्लिमांची वरात काढण्यात आली असती असा दावा केला आहे. संजय शिरसाट यांनी त्यांच्या या दाव्याचाही समाचार घेतला. ते म्हणाले, विजय वडेट्टीवारांचे विधान करणे ही वैचारिक दिवाळखोरी आहे. अनेक मुस्लिम बाबा तुरुंगात आहेत. 2012-13 पासून अनेकजण तुरुंगात आहेत. राम रहीम जेलमध्ये आहे. कोणताही बाबा असो, त्याच्या जातीवर जाऊ नये. हिंदू-मुस्लिम करण्यापेक्षा बलात्कारी अशी भूमिका पाहिजे.

अशोक खरात प्रकरण केवळ अत्याचारापुरते मर्यादित नाही. त्यात जमीन घोटाळ्यासह अनेक प्रकरणांची गुंतागुंत आहे. त्यात चौकशीची कसोटी लागणार आहे. त्याच्या सहकाऱ्यांची नावे लवकरच समोर येतील आणि ते तुरुंगात जातील, असे संजय शिरसाट म्हणाले.

## संपादकीय

# व्यवस्थेच्या डोळ्यांत डोळे घालून प्रश्न विचारणारा महात्मा

भारतीय इतिहासाच्या क्षितिजावर जेव्हा अज्ञानाचा आणि विषमतेचा काळोख दाटलेला होता, तेव्हा त्या अंधाराला भेदून प्रकाशाची पहिली ठिणगी ज्या महापुरुषाने टाकली, ते महात्मा जोतिबा फुले. आज आपण त्यांची २००वी जयंती साजरी करीत आहोत. हे केवळ एका महापुरुषाच्या स्मरणाचे वर्ष नाही, तर त्यांनी मांडलेल्या समतेच्या, विज्ञानाच्या आणि माणुसकीच्या मांडणीचा पुनरारंभ करण्याचे वर्ष आहे. क्रांतीचा सूर्य पुण्याच्या भिडेवाड्यात उगवला आणि त्याची धग आजही विषमतेच्या भिंती जाळत आहे. जोतिबा केवळ एक समाजसुधारक नव्हते, तर ते आधुनिक भारताचे पहिले 'सकळ शास्त्रसंपन्न' क्रांतिकारक होते. जोतिबांच्या कार्याचा पाया हा 'शिक्षण' होता; परंतु त्यांचे शिक्षण केवळ अक्षरांची ओळख करून देण्यापुरते नव्हते. त्यांच्या मते, शिक्षण हे शोषितांच्या हाती दिलेले अस्त्र होते. 'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली...' या ओळींमधून त्यांनी शिक्षणाचा समाजशास्त्रीय कार्यकारणभाव मांडला. हा विचार आजही जागतिक स्तरावर अमान्य करता येत नाही. ज्या समाजात ज्ञानावर एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी असते, तिथे लोकशाही कधीच रुजू शकत नाही हे त्यांनी ओळखले होते. १ जानेवारी १८४८ रोजी भिडेवाड्यात सुरू झालेली मुलींची पहिली शाळा ही केवळ एक शैक्षणिक संस्था नव्हती, तर ती हजारो वर्षांच्या पितृसत्ताक आणि वर्णवर्चस्ववादी मानसिकतेला दिलेले खुले आव्हान होते. २४ सप्टेंबर १८७३ रोजी जोतिबांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज ही शोषितांच्या आत्मभानाची मोठी चळवळ होती. जोतिबांनी 'निर्मिक' ही संकल्पना मांडली. त्यांनी सांगितले की, सर्व मानव एकाच निर्मात्याची लेकरे आहेत, त्यामुळे कोणालाही मध्यस्थ (पुरोहित) मानण्याची गरज नाही. ज्या काळात विचार करणे गुन्हा होता, त्या काळात जोतिबांनी व्यवस्थेच्या डोळ्यांत डोळे घालून प्रश्न विचारण्याचे धाडस दिले. जोतिबांचे साहित्य हा शोषितांच्या दुःखाचा आणि संघर्षाचा दस्तऐवज आहे. त्यांनी 'बळीराजा' हा कष्टकऱ्यांचा सांस्कृतिक नायक म्हणून उभा केला. तत्कालीन संस्कृतप्रचुर भाषेला नाकारून बहुजनांच्या बोलीभाषेला साहित्यात प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी मांडलेले तत्त्वज्ञान हे सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत होते. 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३) या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाची कारणे सांगितली. सावकारी पाश, अस्मानी संकटे आणि सुलतानी जुलूम यावर त्यांनी कडाडून प्रहार केला. जोतिबांचा स्त्री-मुक्तीचा विचार केवळ शाळा काढण्यापुरता मर्यादित नव्हता. त्यांनी सावित्रीबाईंना शिक्षित करून त्यांना वैचारिक सहचारी म्हणून उभे केले. 'बालहत्या प्रतिबंधकगृह' स्थापन करून सामाजिक बहिष्कार सोसणाऱ्या स्त्रियांना आश्रय दिला. एका विधवा स्त्रीच्या मुलाला (यशवंत) दत्तक घेऊन रक्ताच्या नात्यापेक्षा माणुसकीचे नाते श्रेष्ठ असल्याचे सिद्ध केले. ही कृती आजच्या काळातील कोणत्याही मानवी हक्क चळवळीपेक्षा कितीतरी मोठी आणि क्रांतिकारी होती. जोतिबांनी ब्रिटिश राजवटीचे विश्लेषण अत्यंत बारकाईने केले होते. ब्रिटिशांमुळे शिक्षणाची दारे उघडली, हे मान्य करतानाच त्यांनी सावध केले की, सरकारी नोकऱ्यांमध्ये पुन्हा तेच लोक बसले आहेत जे शेतकऱ्यांचे शोषण करतात. भारतातील पहिली कामगार संघटना उभी करण्यात जोतिबांच्या विचारांचा मोठा वाटा होता. कामगारांना सुटी मिळावी, त्यांच्या कामाचे तास निश्चित असावेत, ही मागणी सर्वप्रथम जोतिबांच्याच विचारसरणीतून पुढे आली. ११ मे १८८८ रोजी मुंबईच्या कोळीवाड्यात एका प्रचंड जनसमुदायाने जोतिबांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली. ही पदवी कोणत्याही राजाने किंवा सत्तेने दिलेली नव्हती, तर ती ज्यांच्यासाठी जोतिबा आयुष्यभर लढले, त्या कष्टकरी जनतेने दिलेली कृतज्ञता पावती होती.

## संस्कृत सुभाषित

बीज तेचि फळे येईल शेवटी । लाभ हानी तुही ज्याची तया।।

अर्थ : जे पेराल तेच उगवते आणि लाभ व हानी ही ज्याची त्याची वेगवेगळी असते, म्हणून सत्कर्म करा. सद्विचाराने चाला.

## गुरु वचन

### भक्ती मार्ग सर्वोत्कृष्ट

विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे तीन मार्ग आहेत – ज्ञान, कर्म व भक्ती. वास्तवात हेच ज्ञान आहे, ज्याद्वारे आपण ईश्वर कोण आहे? हे जाणतो. ज्ञान आपल्या मेंदूत साठवले जाते व याद्वारेच आपण ईश्वर प्राप्त करतो. मानवाचा मेंदु छोटा असतो, मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसे जाणतो? हा प्रश्न निर्माण होतो. खरंतर मेंदूत असलेल्या ज्ञानातूनच हे शक्य होते. ज्ञानामुळे मन सुद्धा तृप्त होते. श्रीआनंदमूर्ती यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव असते तोपर्यंत त्याने ज्ञानार्जन करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर तुमच्या ज्ञान ग्रहण करण्याची भूख मिटते कारण तोपर्यंत तुमचे ध्येय ईश्वराला प्राप्त करणे असते.

काही विद्वानांनुसार, कर्मातूनच ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मानव एक क्षण जिवंत राहू शकत नाही म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे धार्मिक व अध्यात्मिक जगतात जेवढी ज्ञानाला किंमत असते, तेवढीच कर्माची असते. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ मनाने ईश्वराची भक्ती केल्यास ईश्वर प्राप्ती अवघड नाही. खरंतर भक्तीच एकमेव मार्ग आहे, ज्यावर मोठ-मोठ्या ज्ञानींनी वाटचाल केली आहे. आपण सर्व मानतो की, संपूर्ण चराचराची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.

म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचीच संतान आहे. जर तुम्ही परमात्म्यास प्रसन्न करु इच्छित असाल तर प्रत्येक जीवाप्रती प्रेम-भाव बाळगा. यासाठी तुम्हाला मानव सेवा, समाज सेवा आणि निराधारांना आधार दिला पाहिजे. मानव सेवा करताना नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. वास्तवात हीच भक्ती आहे. यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव जागृत झाला तर तुम्हाला ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## उपदेशकथा

### अविश्वास

एक धनगर समुद्राकाठी बसून मेंढ्या राखीत असता समुद्राचे पाणी पाहून फार मोहीत झाला. तेव्हा समुद्र अगदी शांत होता आणि जहाजे, गलबते त्यावर फिरत होती. ते पाहून आपणही समुद्रात व्यापार करावा, असे धनगराला वाटले आणि त्याने मेंढ्या विकून गलबत विकत घेतले व माल भरून तो व्यापारास निघाला. परंतु वाटेत मोठे वादळ झाले. गलबत बुडू नये म्हणून सगळा माल त्याने समुद्रात फेकून दिला. त्याचे गलबत एका खडकावर आपटून फुटले. त्यातूनही धनगराचा जीव कसाबसा वाचला. त्यानंतर पुन्हा त्याने मेंढ्या ज्या माणसाला विकल्या होत्या त्याच्याकडे तो नोकरी करू लागला. एकदा तो समुद्राकाठी आला असता समुद्राकडे बघून म्हणाला, 'आता काही मी तुला भुलणार नाही. तुझं खरं रूप मला चांगलं समजलंय.'

कथा उपदेश : ज्याने आपल्याला एकदा फसविले, त्याच्यावर पुन्हा विश्वास ठेवणे धोक्याचे असते.

## पंचांग

| | |
|---|---|
| १२ एप्रिल २०२६ | करण:विष्टि २५:१७:१०+ |
| रविवार | सूर्य:मीन |
| विक्रम संवत्- २०८२ | चन्द्र:मकर |
| चैत्रशके संवत्- १९४८ | हिजरी सन् - १४४६ |
| संवत्सर -पराभवनाम | मुस्लिम मास - शव्वाल |
| अयन- उत्तरायणारंभ | तारीख - २३ |
| मास- चैत्र | विशेष |
| ऋतु- सौर वसंत | पारशी आदर मासारंभ |
| कृष्ण पक्ष | काळभैरव यात्रा- |
| तिथि:दशमी २५:१७:१०+ | मुंजवाडी, पुरंदर (पुणे) |
| नक्षत्र:श्रवण १५:१३:४८ | नाना महाराज तराणेकर |
| योग:साध्य १८:१५:२१ | पुण्यतिथी - नागपूर |
| करण:वणिज १३:०३:१५ | व इंदौर |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १९६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 6 | 4 | | 8 | 2 | | 7 |
| | 3 | 8 | 1 | 2 | 6 | | | |
| 1 | | | | | | | 6 | |
| | | 5 | | | | | | 4 |
| 9 | | | 7 | | 1 | | | 3 |
| 2 | | | | | | 5 | | |
| | 8 | | | | | | | 2 |
| | | | 6 | 7 | 5 | 4 | 8 | |
| 4 | | 7 | 9 | | 2 | 6 | 3 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १९५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 4 | 3 | 5 | 2 | 1 | 6 | 7 |
| 6 | 5 | 2 | 7 | 8 | 1 | 9 | 3 | 4 |
| 7 | 1 | 3 | 6 | 9 | 4 | 5 | 8 | 2 |
| 3 | 7 | 8 | 9 | 4 | 5 | 2 | 1 | 6 |
| 1 | 4 | 9 | 2 | 6 | 7 | 8 | 5 | 3 |
| 2 | 6 | 5 | 1 | 3 | 8 | 4 | 7 | 9 |
| 4 | 3 | 1 | 5 | 2 | 6 | 7 | 9 | 8 |
| 5 | 2 | 6 | 8 | 7 | 9 | 3 | 4 | 1 |
| 9 | 8 | 7 | 4 | 1 | 3 | 6 | 2 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६०६ – ग्रेट ब्रिटनने युनियन जॅकला आपला अधिकृत ध्वज म्हणून मान्यता दिली.
- १८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – दक्षिणेच्या सैन्याने चार्ल्स्टननजीकच्या फोर्ट सम्टरवर हल्ला केला व युद्धास तोंड फुटले.
- १८६४ – अमेरिकन गृहयुद्ध–फोर्ट पिलोची कत्तल – जनरल नेथन बेडफोर्ड फॉरेस्टच्या नेतृत्त्वाखालील दक्षिणेच्या सैन्याने शरण आलेल्या उत्तरेच्या श्यामवर्णीय सैनिकांची कत्तल उडवली.
- १८६५ – अमेरिकन गृहयुद्ध– उत्तरेच्या सैन्याने मोबिल, अलाबामा जिंकले.

### राष्ट्रीय

- १९९७ – भारताचे पंतप्रधान एच.डी.देवेगौडा यांचा राजीनामा.
- २००६ – डान्सबार बंद करण्याचा निर्णय घटनाबाह्य असल्याचे मत व्यक्त करून मुंबई उच्च न्यायालयाने राज्यभरातील डान्सबारवर बंदी घालणारा महाराष्ट्र सरकारचा वटहुकूम रद्द केला.
- २००७ – भारतातील सर्वात मोठी एयरलाइन जेट एयरवेजने एयर सहारावर १४५० कोटी रुपयांत वर्चस्व मिळवले.

### जन्म

- १५७७ – क्रिस्चियन चौथा, डेन्मार्कचा राजा यांचा जन्म.
- १९०२ – लुई बील, नेदरलँडचा पंतप्रधान यांचा जन्म.

### निधन

- २३८ – गॉर्डियन पहिला, रोमन सम्राट यांचे निधन.
- २३८ – गॉर्डियन दुसरा, रोमन युवराज यांचे निधन.
- ३५२ – पोप ज्युलियस पहिला यांचे निधन.
- १९४५ – फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

## : SMS :

Teacher: agar shabd pradooshan kam karna hai to kya karna hai?
Student: hamaare kaan bandh kar leni hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.६ | २४.७ |
| अहमदनगर | ३५ | २२.७ |
| अकोला | ३७.६ | २६.६ |
| अमरावती | ३६.२ | २६.३ |
| बीड | ३८.२ | २५.७ |
| भंडारा | ३७.३ | २३.६ |
| बुलढाणा | २९.५ | १७.६ |
| चंद्रपूर | ३८.८ | २५.७ |
| चेन्नई | ४३ | २७.३ |
| नवी दिल्ली | ३० | १९.३ |
| धुळे | ३५ | २५.५ |
| गोंदिया | ३५.४ | २२.६ |
| जळगाव | ३८.३ | २६.२ |
| कोल्हापूर | ३६.२ | २१.२ |
| लातूर | ३५.५ | २३.७ |
| मुंबई | ३४.८ | २८.२ |
| नागपूर | ३५.७ | २३.९ |
| नांदेड | ३७.४ | २५.६ |
| नंदूरबार | ३३.१ | २५.७ |
| नाशिक | ३३.६ | २०.८ |
| पुणे | ३४.२ | २१.६ |
| पंढरपूर | ३८.४ | २४.८ |
| सातारा | ३६.३ | २०.४ |
| सांगली | ३७.७ | २२.६ |
| सोलापूर | ३८.४ | २६ |
| वर्धा | ३६.६ | २५.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** मिष्टान्न भोजनाचे योग येतील. आपले मनोबल वाढेल. वेगाने कार्यरत राहाल. व्यवसायात नवे तंत्र अंमलात आणू शकाल.

**तुळ :** नवीन वाहन खरेदी, वास्तू खरेदीचे प्रस्ताव मार्गी लागतील. आपल्या वृत्त्वाची सभोवतालच्या व्यक्तींवर चांगली छाप पडेल.

**वृषभ :** व्यापार-व्यवसायात नफा होईल. मात्र तात्पुरत्या स्वरुपात काही अडचणी निर्माण होऊ शकतात. चांगल्या व्यक्तींची भेट होईल.

**वृश्चिक :** मानसिक ताणतणाव जाणविण्याची शक्यता राहते. अंध:श्रद्धेला बळी पडू नका. प्रवासात आपले खिसापाकिट सांभाळावे.

**मिथुन :** काही अविस्मरणीय घटना घडण्याची शक्यता आहे. कामानिमित्त दूरचे प्रवास घडून येतील. उत्तरार्धात व्यक्तीमत्त्वाचा चांगला प्रभाव पडेल.

**धनु :** व्यवसायात नवीन हितसंबंध निर्माण करु शकाल. अपेक्षित गाठीभेटी झाल्याने मन प्रसन्न होईल. जुन्या ओळखींना उजाळा मिळेल.

**कर्क :** विविध उपक्रमातून नवीन परिचय होतील. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. स्वत:ची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी सतत कार्यरत प्रयत्नशील राहाल.

**मकर :** मनातील कल्पना आकारात घेतील.यशस्वी होण्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नका. स्वत:चे प्रयत्न स्वत:च करावेत.


**सिंह :** आपले अचूक अंदाज व योग्य व्यक्तींकडून मिळणारी मदत यामुळे आज आपली निकड भागणार आहे. नवीन कार्यारंभ करण्याचा उत्साह निर्माण होईल.

**कुंभ :** वरिष्ठांची मर्जी संपादन करण्यात यशस्वी व्हाल. प्रामाणिकपणाने प्रयत्न केलेत तर इतरांची मदतही तुम्हाला होईल.

**कन्या :** कार्यकौशल्याची प्रशंसा होईल. आपल्याला एखाद्या व्यवहारात अनपेक्षितरित्या जादा नफा मिळेल. आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**मीन :** शेअर बाजारातील गुंतवणूक आर्थिक फायदा करुन देईल. एखादी महत्वाची बातमी समजल्याने उत्साही बनाल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १९६



### आडवे शब्द

३. इच्छा, आशा
५. विपुल, पुष्कळ
८. मज्जाव (करणे)
११. 'फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार,...'
१३. '... घेता, नाम घ्या श्रीहरीचे'
१४. फांदी
१६. पत्त्यांचा एक खेळ
१९. शोक
२४. वेलीचा मांडव
२५. पृथ्वी
२७. फुटक्या नशिबाचा
२८. चांगले
२९. कागदाचे असते, दोऱ्याचे आणि चलतचित्रपटाचेही!
३०. तोरा
३१. जहाज
३२. भ्रम, ३३. शिवधनुष्य
३५. हिस्सा, ३६. ब्राह्मण
३८. पुरेल इतका
३९. सलगी
४२. श्रम
४३. इतर ठिकाणी
४५. राजाचा अवाजवी आग्रह
४८. सोने
५०. नेत्र
५१. शुल्क (इंग्रजी)
५२. कौशल्य
५४. शस्त्राची तीक्ष्ण कड
५५. नुकसान
५६. संपूर्ण
५७. प्रगटन
५८. गोष्ट
५९. कुंतीचा थोरला पुत्र
६०. पायताण
६२. पंख
६३. मोठेपणा
६४. बालपणीचे दृढ संस्कार
६६. सर्वांचे याअर्थी वापरला जाणारा प्रत्यय- उदा. -- त्रिक
६७. अंत:पुर, जनानखाना
६९. तोंडाने वाजवण्याचे धातूचे एक चपटे छोटे वाद्य
७०. पाप, ७२. अडाणी, माहिती नसलेला
७३. म्हातारपणच्या अनुचित सवयी
७५. पाऊस
७६. लोणी
७७. कंबर
७८. कौशल्य

### उभे शब्द

१. विस्तारपूर्वक
२. तळे
३. जोर, त्वेष
४. एकटा
५. मोकळीक
६. माळजमीन
७. नकली जात
८. मुलींचे एक नाव, गुहा आडनावाच्या जुन्या नटीचे नाव
९. एकाग्र दृष्टी, नजर
१०. काव्य
१२. चित्रकाराची 'लेखणी'
१५. अस्थी
१७. प्रिय व्यक्तींचे एकत्र येणे
१८. अपवित्र
१९. अनपेक्षित, उलट
२०. पंधरवडा
२१. देवाची अर्चना
२२. पराकाष्ठा
२३. अतिशय प्रयत्न
२६. मानलेला मुलगा
२८. विद्यार्थी
३१. त्वचारोग
३१अ. गुलकाडीने पेटणारी, गुल होणारी!
३३. मोराचे सौंदर्य यात असते
३४. भांडण
३५. रस्ता
३७. नीरव
४०. पटकन खाऊन टाकणे
४१. पृथ्वी
४३. ऊस
४४. जखमांमधून रक्त वाहत असलेला
४६. पृथ्वीचा पाण्याने व्यापलेला पृष्ठभाग
४७. दूर
४९. तोंडदेखले
५०. लगेच
५३. उत्सव
५७. शर्त
६०. खेड्यातील रहिवासी
६१. सकल ज्ञान असलेला
६२. गादिमांनी सांगितलेले अजरामर सत्य. '----- आहे जगती पुत्र मानवाचा'
६३. मत्स्य
६४. मंडई
६५. ललाट
६६. अभिनयासह
६८. भावजय
६९. थापा मारणारा
७१. कावेबाज
७२. इतर
७४. चामडे

### जम्बो शब्दकोडे क्र. १९५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.लालूप्रसाद यादव ७.अचानक ९. कोस ११.हर १२.दरसाल १४.पलायन १५.नगर १६.कवी १७.हटवादी २०.लस २१.वर्ण २२.वात २३.सनदशीर २६.लज्जास्पद २७.दारू २९.वाया ३०.कपटी ३२.नीरस ३४.ससाणा ३६.अमर ३७.कसकस ३८.रामराम ४१.पातक ४३.रम ४४.आसन ४५.दाखला ४६.जळजळ ४७.नरम ४८.कास ५१.घेवडा ५२.वदंता ५२अ. महाराजा ५३.त्राता ५४.ओळख ५६.डक ५७.थडगे ५८.पार ६०.वेतन ६२.चरा ६४.डफली ६६.दरवळ ६८.कसा ७०.मजा ७०अ.खो ७१.वाल ७२.साखर ७३.समाचार ७४.तळवा ७६.बाळ ७८.बन ७९.क्षालन ८०.टक्का ८१.मनमुराद

उभे उत्तर : १.लालनपालन २.प्रहर ३.सार ४.यादवी ५.दर ६.वसाहत ८.कपबशी ९.कोयल १०.सनसनाटी १३.लट १६.कर्ण १८.वास १९.दीनवाणा २१.वदनी कवल घेता २२.वारू २४.दया २५.रकमपात २७.दास २८.दसरा ३१.परत ३३.रस ३५.साम दाम दंड भेद ३७.कमळ ३८.रास ३९.मनन ४०.कलाकार ४२.कस ४३.रजनीनाश ४४.आरडाओरड ४९.समता ५०.सराईत ५२.ताक ५३.लगेच ५५.खपली ५९.नवल ६१.नजरकैद ६३.रमारक्षा ६५.फराळ ६७.रवाळ ६८.कसब ६९.सामान ७४.तन ७५.वाट ७६.बाका ७७.पान

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महात्मा फुले यांच्या नऊ जुन्या अल्पचरित्रांचा संग्रह प्रकाशित होणार

पुणे (दैनिक संध्या) : महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात एक खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. "महात्मा जोतीराव फुले : नऊ जुनी अल्पचरित्रे (१८९१-१९३९)" या महत्त्वाच्या ग्रंथाचे प्रकाशन शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील संत ज्ञानेश्वर सभागृहात होणार आहे. या ग्रंथाचे संपादन इतिहासाच्या प्राध्यापिका आणि विभागप्रमुख श्रद्धा कुंभोजकर यांनी केले असून, त्यांना इतिहास विषयाचे संशोधक विद्यार्थी बापूराव घुंगरगांवकर यांची साथ लाभली आहे. या दोघांनीही महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि कार्याचा अभ्यास करून त्यांच्या विषयी लिहिलेली जुनी अल्पचरित्रे एकत्रित करण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी असणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व आणि संग्रहालय विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्ग उपस्थित राहणार आहेत. या मान्यवरांच्या उपस्थितीत होणारा हा कार्यक्रम शैक्षणिक आणि वैचारिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जात आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या निधनानंतरच्या पहिल्या पन्नास वर्षांत, म्हणजे १८९१ ते १९३९ या कालावधीत विविध लेखकांनी त्यांच्या जीवनावर आधारित नऊ अल्पचरित्रे लिहिली होती. या चरित्रांमध्ये फुले यांच्या कार्याचा, त्यांच्या सामाजिक योगदानाचा आणि त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचा तपशीलवार आढावा घेतला आहे. विशेष म्हणजे ही चरित्रे विविध जात, वर्ग आणि प्रदेशातील लेखकांनी लिहिलेली असल्याने त्यांना ऐतिहासिकदृष्ट्या अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या नव्या ग्रंथामध्ये आठ मराठी आणि एक इंग्रजी अशा नऊ अल्पचरित्रांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व चरित्रांचे एकत्रित पुनर्प्रकाशन प्रथमच करण्यात येत असून, संशोधक आणि वाचकांसाठी हा एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार आहे. महात्मा फुले यांच्या जन्मदिनाच्या द्विशताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर हा ग्रंथ प्रकाशित होत असल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. फुले यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न आहे.



### पाणीकपात करावी की नाही, हे महापालिकेनेच ठरवावे - विखे पाटील

पुणे (दैनिक संध्या) : यंदा पावसाळ्यात सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागासह स्कायमेट या संस्थेनेही दिला आहे. त्यामुळे राज्यातील धरणांत ३१ ऑगस्टपर्यंत पाणीसाठा टिकेल, या दृष्टीने नियोजन करण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार पुणे महापालिकेलाही पाणीकपातीबाबत नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. पाणीवापराबाबतच्या नियोजनात महापालिकेने सहकार्य न केल्यास त्याचा भुर्दंड महापालिका आणि पर्यायाने पुणेकरांना बसणार आहे. त्यामुळे पाणीकपात करावी की नाही, हे महापालिकेनेच ठरवावे, असे सांगून पाणीकपातीच्या निर्णयाचा चेंडू जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महापालिकेच्या कोर्टात टोलविला आहे. त्यामुळे याबाबत महापालिका आता काय निर्णय घेणार, याकडे पुणेकरांचे लक्ष लागून आहे. दोन दिवसांपूर्वी जलसंपदा विभागाने महापालिकेला सध्याचा पाणीसाठा आणि पुढील पावसाळ्यातील पावसाचा अंदाज घेऊन धरणांतील पाणी लक्षात घेता पाणी उचल करताना १५ टक्के पाणीकपात करावी, असे निर्देश दिले होते. त्यावर महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी मात्र ही शक्यता फेटाळली होती. पुणेकरांच्या हक्काचा एक थेंबही कपात केला जाणार नाही, असे निक्षून सांगितले होते. त्याबाबत विखे पाटील यांनी शुक्रवारी (दि. १०) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत याबाबत आढावा घेतला. बैठकीनंतर विखे यांनी पत्रकारांशी बोलताना महापालिकेच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, "पाणीकपातीचा मुद्दा हा जलसंपदा किंवा महापालिकेचा नाही. यावर्षी पाऊसमान कमी असल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभाग तसेच स्कायमेट या दोन संस्थांनी स्पष्ट केले आहे. यंदाच्या अल निनो या घटकाच्या प्रभावामुळे सरासरीच्या तुलनेत पाऊस कमी असेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाची स्थिती गंभीर असल्यास सर्व धरणांमध्ये पाणीसाठा किमान ३१ ऑगस्टपर्यंत पुरेल, असे नियोजन केले आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात येणार असून त्यानुसार महापालिकेला निर्देश दिले आहेत."

### शहराच्या मध्यवर्ती भागात झाडाझडती, पोलिसांची 40 जणांविरोधात कारवाई

पुणे (दैनिक संध्या) : डेक्कन जिमखाना, शिवाजीनगर, तसेच मध्य भागातील विश्रामबाग, खडक, समर्थ, फरासखाना पोलिस ठाण्यांच्या हद्दीत पोलिसांनी गुरुवारी रात्री झाडाझडती घेतली. या कारवाईत वेगवेगळ्या भागांत तपासणी करण्यात आली. बेकायदा प्रकार करणाऱ्या ४० जणांविरोधात खटले, तसेच गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात आली. परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या नेतृत्वाखाली फरासखाना, समर्थ, खडक, विश्रामबाग, डेक्कन आणि शिवाजीनगर पोलिस ठाण्यांच्या हद्दीत ही मोहीम राबविण्यात आली. मध्य भागातील ४१ संवेदनशील ठिकाणे, मोकळ्या जागा, तसेच सार्वजनिक जागांची तपासणी करण्यात आली. सार्वजनिक मद्यपान, अमली पदार्थांचे सेवन, शांतता भंग करणे, तसेच छेडछाड करणाऱ्यांविरोधात पोलिसांकडून कारवाई करण्यात आली. गुरुवारी रात्री दोन तास ही मोहीम राबविण्यात आली. भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये दोन गुन्हे दाखल केले. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणे (कोटपा ॲक्ट) अन्वये पाच खटले दाखल करण्यात आले. महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये २२ जणांविरुद्ध कारवाई केली. वाहतूक नियमभंग केल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई केली.

# मिळकतकरावर 5 ते 10% सूट; 31 मेपर्यंत लाभ

## महापालिकेचे आवाहन; नागरिकांनी ऑनलाइन कर भरण्यास प्राधान्य द्यावे



**पुणे (दै. संध्या)**

महानगरपालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठी मिळकतकराची सर्व देयके तयार केली असून, नागरिकांना कर भरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सर्वसाधारण करामध्ये 5 ते 10 टक्क्यांपर्यंत सवलत जाहीर केली आहे.

ही सवलत 31 मे पर्यंत लागू राहणार असून, दिलेल्या मुदतीत संपूर्ण मिळकतकर भरणाऱ्या नागरिकांनाच तिचा लाभ मिळणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शेवटच्या क्षणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने कर भरण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे. यासाठी अधिकृत संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

याशिवाय, नागरिकांना बँक ऑफ महाराष्ट्र, आयसीआयसीआय बँक आणि कॉसमॉस बँकेत मिळकतकर भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच, महापालिकेची सर्व नागरी सुविधा केंद्र सोमवार ते शनिवार सकाळी 10 ते दुपारी 4 या वेळेत सुरू राहणार आहेत. नागरिकांनी शक्यतो ऑनलाइन कर भरावा, असे आवाहन करआकारणी व करसंकलन विभागाचे प्रमुख उपाआयुक्त रवी पवार यांनी केले आहे.

# दिव्यांग धोरणात पार्किन्सनचा समावेश

## रक्ताशी संबंधित आजारांसाठी स्वतंत्र सुविधा देण्याची गरज; कार्यकर्त्यांचा आग्रह

**पुणे (दै. संध्या)**

दिव्यांग व्यक्तींना सामान्य व्यक्तींप्रमाणे सुसह्य जीवन जगण्यासाठी राज्य शासनाने दिव्यांग धोरण अंमलात आणले आहे. दिव्यांगत्वाच्या एकूण 21 प्रवर्गांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये पार्किन्सन आजाराचा एक दिव्यांगत्व प्रकार म्हणून समावेश केला आहे.

तथापि नव्याने समाविष्ट दिव्यांगत्वाच्या प्रवर्गाच्या अनुषंगाने विशेषतः रक्ताशी संबंधित आजार



असलेल्या दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र योजना व कार्यक्रम आखणे आवश्यक असल्याचे मत दिव्यांग संघटनांकडून व्यक्त होत आहे.

दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार विशेष गरजा लक्षात घेऊन योजनांची निर्मिती केली जात नाही. तात्पुरत्या स्वरूपात दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांगांना देखील उपचार तसेच सहाय्यक साधनांची गरज असते. त्यामुळे किमान उपचारात्मक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, अशी अपेक्षा दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते हरिदास शिंदे यांनी व्यक्त केली आहे. हात पाय थरथरणे, शारीरिक हालचाल मंदावणे, चेहऱ्यावरील हावभाव बदलणे, अवयवांमध्ये शिथिलता, बोलण्यात कठीणता अशा विविध कारणांमुळे दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवणे अवघड होते.

पार्किन्सनग्रस्त दिव्यांगांसाठी आवश्यकतेनुसार औषधोपचार, सहाय्यक साधनांची उपलब्धता, शस्त्रक्रिया, भौतिकोपचार मोफतपणे मिळण्यासाठी स्वतंत्र योजना आखली पाहिजे. दिव्यांग हक्क अधिनियम 2016 नुसार समाविष्ट सर्व प्रवर्गातील दिव्यांगांचे समांतर सक्षमीकरण आवश्यक आहे.

# ॲनेक्समध्ये रात्रीच्या बांधकामामुळे नागरिक त्रस्त

**पुणे (दै. संध्या)**

कोरेगाव पार्क ॲनेक्स परिसरात रात्रीच्या वेळी सुरू असलेल्या बांधकामामुळे नागरिक त्रस्त झाले असून, या प्रकरणात आता वाद अधिकच तीव्र झाला आहे. 'ॲटेलियर ग्रीन्स' सोसायटीतील एका रहिवाशाने पुणे महापालिकेच्या निष्क्रियतेचा आरोप करत वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे म्हटले आहे.

सुदीप माने यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे धाव घेतली असून, त्यांनी 11 दिवसांपासून सुरू असलेल्या प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

त्यांच्या मते, परिसरात रात्री उशिरापर्यंत जेसीबी व इतर यंत्रसामग्रीद्वारे बांधकाम सुरू असते, जे नियमांचे स्पष्ट उल्लंघन आहे. रात्री 9.30 नंतरही काम सुरू राहत असल्याने नागरिकांच्या झोपेचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# पुण्यात पोलिसांचा खंडणी घोटाळा उघड; बडतर्फीची कारवाई निश्चित

**पुणे (दै. संध्या)**

मंगळवार पेठेतील एका नामांकित कॉलेजच्या प्राचार्यांना बाललैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात अटक करण्याची भीती दाखवून खंडणी उकळणारा पोलिस उपनिरीक्षक अजित बडे, रिलस्टार सोनाली हिंगेसह, आयटी अभियंता तरुण-तरुणींना ब्लॅकमेल करून दहा हजार रुपये उकळणाऱ्या तिघा पोलिसांवर बडतर्फीची कारवाई होणार आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी ही माहिती दिली आहे.

■ खोट्या गुन्ह्याची भीती दाखवून पैसे उकळल्याच्या प्रकरणात अनेक पोलिसांवर निलंबन व बडतर्फीची कारवाई होणार असल्याची माहिती समोर आली आहे

पोलिस दलाची प्रतिमा मलीन करणाऱ्यांची गय केली जणार नाही. कोणी असे समजू नये, की आम्ही येथे डोळ्यावर पट्टी बांधून बसलोय. कोणाच्याही चुकीला माफी नाही. त्यामुळे त्या सहा पोलिसांना पोलिस खात्यातून काढून टाकले जाईल, असे अमितेश कुमार यांनी सांगितले. पीएसआय अजित बडे, रिलस्टार सोनाली हिंगे, पोलिस कर्मचारी सुदाम तायडे या तिघांनी एका प्राचार्यांना ब्लॅकमेल करून पोक्सोच्या खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची भीती दाखवून त्यांच्याकडून सात लाख रुपयांची खंडणी उकळली.

अमितेश कुमार यांच्या कानावर हा प्रकार येताच त्यांनी याबाबत मोठी ॲक्शन घेत या तिघांवर खंडणीचा गुन्हा दाखल केला. दरम्यान, या तिघांच्या कृत्यामुळे पोलिस दलाची प्रतिमा मलीन झाल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर नुकतीच निलंबनाची कारवाई केली आहे. एवढी कारवाई त्यांच्याबाबत पुरेशी नसल्याचे सांगत अमितेश कुमार यांनी या तिघांवर बडतर्फीची (पोलिस खात्यातून काढून टाकणे) कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. वाघोली पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार किरण अब्दागिरे, पोलिस शिपाई गणेश खाडे आणि किरण कांबळे या तिघांनी आयटी अभियंता मित्र-मैत्रिणीला सेक्स रॅकेटमध्ये अडकवून गुन्हा दाखल करण्याची धमकी देत दहा हजार रुपये उकळले. तरुणाला मारहाण देखील केली.

पैसे उकळण्याचा हा प्रकार समोर येताच तिघांवर पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. अभियंता तरुण-तरुणीने पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आपल्यासोबत झालेल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर उपायुक्त सोमय मुंडेंना याबाबत चौकशी करण्याचे अमितेश कुमारांनी आदेश दिले होते. त्यांच्या चौकशीत या तिघांनी रात्रपाळी कर्तव्यावर असताना नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या कॉलची पूर्तता करत असताना तरुण-तरुणीला पोलिस ठाण्यात घेऊन आले. कॉलच्या अनुषंगाने जर असा काही प्रकार होता तर, त्या दोघांवर योग्य ती कारवाई करणे गरजेचे होते. परंतु या पोलिसांनी असे न करता त्यांना धमकावून तरुणाकडून एका गॅरेजवाल्याच्या फोन पेवर दहा हजार रुपये घेतले.

खंडणीचा गुन्हा दाखल होताच पोलिस उपनिरीक्षक अजित बडे, रिल्सस्टार पोलिस सोनाली हिंगे आणि पोलिस कर्मचारी सुदाम तायडे हे तिघे फरार झाले आहेत. त्यांच्या शोधासाठी पोलिसांची पथके मागावर असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे या तिघांवर सध्यातरी अटकेची तलवार टांगती आहे.

# येरवडा मनोरुग्णालयात गोंधळ; स्वच्छता बंद, ऐतिहासिक वस्तू भंगारात

**पुणे (दै. संध्या)**

येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयातील बिटिशकालीन ऐतिहासिक (अँटिक) साहित्य जपून ठेवण्याऐवजी हे साहित्य भंगारात देण्यात आले आहे. तर स्वच्छतेचे अधिकृत कंत्राट असलेल्या लोकराज्य सहकारी संस्थेचे तब्बल 20 महिन्यांचे देयक (बिल) थकल्याने या संस्थेने काम बंद केले आहे. त्यामुळे मनोरुग्णालयात स्वच्छतेची जबाबदारी रोजंदारीवरील कामगारांना देण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात मात्र रुग्णांकडूनच स्वच्छता व इतर कामे करून घेतली जात असल्याचे वास्तव आहे.

रुग्णालयात स्वच्छता करणाऱ्या कंत्राटी कामगार संस्थेचे मागील 20 महिन्यांचे सुमारे पावणेतीन कोटी रुपये देयक मनोरुग्णालय प्रशासनाने अदा न केल्याने ठेकेदाराने 1 एप्रिल पासून स्वच्छतेचे काम बंद केले आहे. रुग्णालय प्रशासनाने मात्र जेवढे काम केले होते तेवढे देयक संबंधित ठेकेदाराला अदा केले आहे. रुग्णांकडून काम करून घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती अधीक्षक डॉ. श्रीनिवास कोलोड यांनी दिली. मनोरुग्णालयाचा भोंगळ कारभार सुरू असून अनेक किस्से समोर येत आहेत.

मनोरुग्णालयाच्या अनागोंदी कारभाराच्या दैनिक 'पुढारी'मध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर रुग्णालय प्रशासन खडबडून जागे झाले आहे. सदर रुग्णालय हे बिटिश कालीन आहे. बिटिशांनी रुग्णालयात वापरलेले साहित्य होते. हे साहित्य हेरिटेज वस्तू म्हणून जतन केले जात होते. मात्र, या वस्तू चक्क भंगारात विकण्यात आल्या आहेत. यासाठी कोणी परवानगी दिली, याची चौकशी होणे गरजेचे आहे. रुग्ण असलेल्या वॉर्डात स्वच्छता का होत नाही,

# पाषाण तलावातील मासे मृत्यू प्रकरणी ४ अधिकाऱ्यांचे निलंबन; मनपाची कडक कारवाई

## एसटीपी बिघाडामुळे दूषित पाणी तलावात; मुख्य अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस

**पुणे (दै. संध्या)**

दूषित पाण्यामुळे पाषाण तलावातील माशांच्या मृत्युप्रकरणी महापालिकेने कडक कारवाई करत चार अधिकाऱ्यांना थेट निलंबित केले आहे, तर मुख्य अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या कारवाईने प्रशासकीय वर्तुळात जोरदार खळबळ माजली आहे.

महापालिकेच्या मलनिस्सारण व देखभाल दुरुस्ती विभागाचे कार्यकारी अभियंता अजय कुमार वायसे, कनिष्ठ अभियंता अतुलकुमार कडू तसेच औंध बाणेर विभागाचे आरोग्य निरीक्षक आरोग्य निरीक्षक विजय भोईर आणि विनायक चोपडे अशी निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. तर



मलनिस्सारण व देखभाल दुरुस्ती विभागाचे मुख्य अभियंता जगदीश खानोरे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

गेल्या काही दिवसात पाषाण तलावातील मासे मोठ्या प्रमाणावर मृत अवस्थेत आढळले होते. आयुक्त नवल किशोर राम यांनी शुक्रवारी या तलावाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करून माशांच्या मृत्यू नक्की कशामुळे होत आहे, याची माहिती घेतली होती. महापालिकेच्या प्राथमिक तपासात तलावालगत उभारलेले एक एमएलडी क्षमतेचे सांडपाणी शुद्धीकरण केंद्र (एसटीपी) व्यवस्थित कार्यरत नसल्याचे समोर आले. या केंद्रातून प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट तलावात सोडले जात असल्याने जलजीवनावर गंभीर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन आयुक्त राम यांनी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश काढले आहेत.

दरम्यान, आयुक्तांनी पाषाण तलाव पाहणी केली असता मोठ्या प्रमाणावर कचरा साचलेला आढळला. या पार्श्वभूमीवर औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत आरोग्य निरीक्षक भोईर आणि चोपडे यांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. परिमंडळ 2 चे उपआयुक्त संतोष वारुळे यांनी यासंदर्भातील आदेश काढले आहेत. दोन्ही अधिकाऱ्यांविरोधात विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून, निलंबन काळात परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.

पाषाण तलाव हा शहरातील महत्त्वाचा पर्यावरणीय वारसा मानला जातो. या प्रकरणी मनपाने केलेल्या दुहेरी कारवाईमुळे संबंधित विभागांमध्ये खळबळ उडाली असून, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाबाबत निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

# पुणे प्रदूषण वाढले; हॉटमिक्स प्लांट शहराबाहेर हलवणार

## स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांची घोषणा, नागरिकांच्या आरोग्यासाठी निर्णय

**पुणे (दै. संध्या)**

पुणे शहराच्या वायू प्रदुषणात वाढ होत आहे. यामुळे पुणेकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात अनेक भागात खाजगी तसेच महापालिकेचे आरएमसी प्लांटस् , डांबर प्लांटस् (हॉटमिक्स प्लांट) आहेत. यामुळे प्रदुषणाचा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा विचार करुन प्रामुख्याने महापालिकेचे आरएमसी प्लांट आणि डांबर प्लांट शहराबाहेर हलविण्यासाठी प्रशासनाने काम करावे.

तसेच शहरात प्रदूषण नियामक मंडळाच्या नियमांचे उल्लंघन करून सुरू असलेल्या प्लांटस्वर तातडीने कारवाई करावी, असे आदेश प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

नगरसेवक हरिदास चरवड यांनी वडगाव परिसरात सुरू असलेल्या आरएमसी प्लांटस्मुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असल्याने कारवाई करावी. दाट लोकसंख्येच्या ठिकाणी असलेले हे प्लांटस् हलवावेत असा प्रस्ताव



स्थायी समितीला दिला होता. यावर आज स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा झाली.

प्रदूषण नियामक मंडळाच्या

■ शहरात प्रदूषण नियामक मंडळाच्या नियमांचे उल्लंघन

■ आरएमसी प्लांटस्मुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण

नियमांचे उल्लंघन करून सुरू असलेले आरएमसी तसेच डांबर प्लांटवर तातडीने कारवाई करावी, असे आदेश प्रशासनाला दिले आहेत. तसेच नजीकच्या काळात शहराच्या हद्दीवर लोकसंख्या कमी असलेल्या भागांमध्ये हे प्रकल्प हलवण्याबाबत खाजगी व्यावसायीकांना देखिल आवाहन करण्यात येणार आहे.

महापालिकेचा देखिल येरवडा येथे डांबर प्लांटस् आहेत. लवकरच हे डांबर प्लांटस् देखिल शहराच्या हद्दीवरील चार कोपऱ्यांमध्ये विभागण्यात येतील.

यासाठी जागांचा शोध सुरू असून शिंदेवाडी जकातनाका आणि वाघोली येथील जागेत नव्याने प्लांटस उभारण्याची पुढील सहा महिन्यांत कार्यवाही करण्याबाबत प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत, असे श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### "प्रत्येक गोष्टीसाठी कोर्टाची पायरी चढू नका"; सुप्रीम कोर्टाने फेटाळल्या 25 जनहित यचिका

दिल्ली (दैनिक संध्या) : गेल्या अनेक वर्षांपासून न्यायव्यवस्थेवरील ताण वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे. देशभरातली सर्वच न्यायालयांमध्ये याचिका दाखल करण्याचे प्रमाण वाढले असून, याचा ताण न्यायमूर्तींवरही येत आहे. यातच प्रत्येक गोष्टीसाठी न्यायालयात येऊ नका, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने एकाच सुनावणीत २५ जनहित याचिका फेटाळ्याची माहिती मिळाली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने म्हटले आहे की, याचिकाकर्त्यांनी सर्वप्रथम संबंधित प्रशासकीय आणि संबंधित प्राधिकरणांकडे संपर्क करावा. तेथे कोणतीही कारवाई न झाल्यासच न्यायालयात हस्तक्षेपासाठी यावे. विविध मुद्द्यांवर अधिकाऱ्यांना शिक्षित करणे आणि संवेदनशील बनवणे ही पहिली पायरी असावी, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. पुढे खंडपीठाने स्पष्ट केले की, वकिलांनी मुद्दे समजून घेऊन योग्य ठिकाण निवडणे अपेक्षित आहे. प्रत्येक धोरणात्मक बाबतीत न्यायपालिका हा शेवटचा आधार आहे, पहिला नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने जातीय जनगणनेला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली. सरन्यायाधीशांनी याचिकेतील मजकूर आणि वापरलेल्या भाषेवर तीव्र आक्षेप व्यक्त केला. तुम्ही अशी भाषा कुठून शिकता? तुम्हाला या प्रकारची अपमानास्पद भाषा कुठून मिळते? तुम्ही याचिका कशा लिहिता?, असे थेट सवाल याचिकाकर्त्यांना केले. दरम्यान, फेटाळलेल्या याचिकांमध्ये एकसमान भाषा धोरण, साबणातील रसायनांवर नियमन आणि देशव्यापी अन्न नोंदणी मोहिमेची मागणी करण्यात आली होती. एका जनहित याचिकेत भिकारी आणि तृतीयपंथी लोकांसारख्या वंचित गटांच्या उन्नतीसाठी धोरण तयार करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. ९ मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयाने गुप्ता यांनी दाखल केलेल्या पाच जनहित याचिका निरर्थक असा शेरा मारून फेटाळून लावल्या. एका याचिकेत कांदा आणि लसूणमध्ये "तामसिक" (नकारात्मक) ऊर्जा आहे की नाही हे ठरवण्यासाठी वैज्ञानिक अभ्यासाची मागणी करण्यात आली होती.



### भाजपचा व्यापक कार्यक्रम! सहा महिन्यांत तयार करणार तब्बल 50 लाख प्रशिक्षित कार्यकर्ते

मुंबई (दैनिक संध्या) : भारतीय जनता पक्षाने येत्या सहा महिन्यांत ५० लाख प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला आहे. पक्षाबाबतची माहिती या प्लॅटफॉर्मवर विस्ताराने दिली जाईल आणि त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची ऑनलाइन उत्तरे द्यावी लागतील. भाजपने पक्षांतर्गत प्रशिक्षणाचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला असून त्याचाच एक भाग म्हणून दिल्लीतील पक्ष मुख्यालयात देशभरातील अडीचशे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी शुक्रवारी घेतली. या बैठकीत राष्ट्रीय संघटन सरचिटणीस बी. एल. संतोष, सहसंघटन मंत्री शिवप्रकाश आदीनी मार्गदर्शन केले. प्रत्येक राज्यातील प्रदेशाध्यक्षांसह नऊ जण या बैठकीला उपस्थित होते. भाजपचे देशभरात १४ कोटी ५८ लाख प्राथमिक सदस्य आहेत. त्यातील साडेतीन कोटी सदस्य असे आहेत की ज्यांच्यावर पक्षाची काहीतरी जबाबदारी आहे. या साडेतीन कोटी सदस्यांना पक्षाची विस्तृत माहिती असावी यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म सज्ज झाला आहे. भाजपच्या आधी असलेला जनसंघ, त्याचा प्रवास, पक्षाची वैचारिक बैठक काय आहे, कार्यकर्त्यांच्या अपेक्षा, पक्षाची शिस्त, थोर नेत्यांबाबतची माहिती या प्लॅटफॉर्मवर दिली जाईल आणि त्या आधारे प्रश्न विचारले जातील, ज्याची उत्तरे देत कार्यकर्ते घरबसल्या प्रशिक्षित होतील. देशात कोणत्याही राजकीय पक्षाने पहिल्यांदाच अशी प्रशिक्षण योजना आणली आहे. देशभरात सध्या भाजपची निवासी प्रशिक्षण शिबिरे सुरू आहेत. त्या बाबतचा आढावा घेताना नितीन नबीन यांनी पक्षात बिघडलेल्या शिस्तीवर बोट ठेवले. अनेक प्रशिक्षण शिबिरांत कार्यकर्ते पाय पसरून आरामात बसले होते, हे काही फोटोंमध्ये दिसले, ही खेदाची बाब आहे. प्रशिक्षण हा विषय आपण किती गांभीर्याने घेतो हे त्यावरून दिसते, अशी कानउघाडणी त्यांनी केली.



### मंत्री झिरवाळ 'व्हिडिओ' प्रकरणाला नवं वळण; FIR रद्द करण्यासाठी आरोपीची कोर्टात धाव

मुंबई (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते आणि मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित कथित आक्षेपार्ह व्हिडिओ प्रकरणाने आता कायदेशीर वळण घेतले आहे. या प्रकरणात ज्या व्यक्तीवर व्हिडिओ लीक केल्याचा आरोप आहे, त्याने आता थेट मुंबई हायकोर्टाचा दरवाजा ठोठावला असून, आपल्यावरील एफआयआर रद्द करण्याची मागणी केली आहे. या नव्या घडामोडीमुळे हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये मंत्री नरहरी झिरवाळ एका ट्रान्सजेंडर व्यक्तीसोबत आक्षेपार्ह स्थितीत असल्याचा दावा करण्यात आला होता. याप्रकरणी मुंबईतील कफ परेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही तक्रार त्याच ट्रान्सजेंडर व्यक्तीने दाखल केली होती, जिने आरोपीला आपला भाऊ असल्याचे सांगितले आहे. आरोपीने मूळ व्हिडिओशी छेडछाड करून तो लीक केल्याची तक्रार करण्यात आली होती. व्हिडिओच्या माध्यमातून संबंधित व्यक्तीला धमकावण्याचा प्रयत्न केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. आरोपीने हायकोर्टात याचिका दाखल करून स्वतःवरील आरोप फेटाळले आहेत. त्याने दावा केला की, त्याला जाणीवपूर्वक खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आले आहे. संबंधित ट्रान्सजेंडर व्यक्तीवरच खंडणी, ब्लॅकमेलिंग, गुन्हेगारी धमकी आणि कटाचे आरोप लावून गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्याने केली आहे.

# अंधश्रद्धेचा बळी! मुलीच्या मृत्यूनंतर ६ महिने अंत्यसंस्कार नाहीत

## बापाच्या कृत्याने पोलीस हादरले; वडिलांनी मुलीचा मृतदेह घरातच ठेवला होता

**मेरठ (दै. संध्या) :**

उत्तर प्रदेशातील मेरठ येथे एका वडिलांनी मुलीच्या मृत्यूनंतर तिच्यावर अंत्यसंस्कार करण्याऐवजी ६ महिने तिचा मृतदेह घरात लपवून ठेवला. बापाने ३ महिने मृतदेहावर परफ्यूम फवारून दुर्गंधी दाबण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिचा सापळा एका खोलीत बंद करून फरार झाला. ही घटना समोर येताच पोलीसही हादरले.

माहितीनुसार, आरोपी उदय भानू विश्वास शिक्षण विभागात निवृत्त कर्मचारी आहेत. ते ३२ वर्षीय अविवाहित मुलगी प्रियंकासोबत राहत होते. जुलै २०२५ मध्ये प्रियंकाची तब्येत खराब झाली. तिला कावीळ झाली होती. हळूहळू तिची तब्येत ढासळत गेली परंतु वडिलांनी हॉस्पिटलला जाण्याऐवजी तंत्र मंत्राचा उपचार करण्यासाठी तिला मांत्रिकाकडे नेले. २ ऑक्टोबर २०२५ ला दसरा होता, त्यादिवशी नातेवाईकांनी प्रियंकाला अखेरचे पाहिले होते. त्यानंतर अचानक ती लोकांच्या नजरेतून गायब झाली. जेव्हाही कुटुंबाने उदय भानूकडे विचारणा केली तेव्हा तो उडवाउडवीची उत्तरे देत होता.

सप्टेंबर २०२५ मध्ये प्रियंकाचा मृत्यू झाल्याचं पोलीस तपासात समोर आले. वडिलांनी ही गोष्ट लपवून ठेवली होती. आरोपी वडिलांनी मुलीचा मृतदेह घरातच



ठेवला होता. ३ महिन्यापर्यंत या मृतदेहावर परफ्यूम फवारण्यात येत होते जेणेकरून त्याचा दुर्गंध पसरू नये. जेव्हा डिसेंबरपर्यंत मृतदेहाचे हाडांच्या सापळ्यात रुपांतर झाले त्यानंतर आरोपीने एका खोलीत ते ठेवून फरार झाला. नातेवाईकांनी सातत्याने उदय भानूशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. जानेवारी २०२६ मध्ये नातेवाईकांनी फोन केला तेव्हा मुलीला उपचारासाठी देहराडूनला आणल्याचं बापाने सांगितले. त्यानंतर त्याने नातेवाईकांचे कॉल उचलणे बंद केले, ज्यातून संशय बळावला.

नातेवाईकांनी त्याला पकडले आणि घरी घेऊन गेले. या घटनेची माहिती पोलिसांनाही दिली. पोलीस घटनास्थळी पोहचली तेव्हा बंद असलेल्या खोलीचा दरवाजा उघडताच आतील दृश्य पाहून सगळेच हैराण झाले. या खोलीत प्रियंकाच्या हाडांचा सापळा पडला होता. मृतदेह इतका कुजलेला होता की शरीरावर केवळ काही केस आणि हाडांचे अवशेष बाकी होते. मुलीला उपचारासाठी मांत्रिकाकडे घेऊन गेलो होतो. तिला कावीळ झाली होती. परंतु योग्य उपचार न मिळाल्याने तिचा मृत्यू झाला. त्यानंतर अंत्यसंस्कार करण्याऐवजी तिचा मृतदेह घरी ठेवल्याची कबुली आरोपी बापाने पोलिसांना दिली.

दरम्यान, पोलीस या घटनेची सर्व अँगलने चौकशी करत आहेत. प्रियंकाच्या मृतदेहाचे अवशेष फॉरेन्सिक लॅबला पाठवण्यात आले आहे. तिचा मृत्यू नेमका कसा झाला याची चौकशी करण्यात येत आहे. अंधश्रद्धेमुळे हा बळी गेला का याचाही शोध घेत आहेत. या घटनेत अन्य काही कारण आहे का याद्दष्टीनेही पोलीस तपास करत आहेत.

## स्लीपर वंदे भारत आता मुंबईतून धावणार, रेल्वे मंत्रालयाची मंजुरी

**मुंबई (दै. संध्या) :**



हावडा ते कामाख्या मार्गावर भारताची पहिली स्लीपर वंदे भारत ट्रेन सुरू करण्यात आली. संपूर्ण देशात स्लीपर वंदे भारत ट्रेनची चर्चा आहे. दुसरी ट्रेन कधी सुरू होणार याबाबत देशभरातील प्रवाशांना उत्सुकता आहे. आता लवकरच दुसरी वंदे भारत ट्रेन सुरू होणार असल्याचा कयास आहे. कारण एका स्लीपर वंदे भारत ट्रेनला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली असून, ही वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेस ट्रेन मुंबईतून धावणार आहे.

रेल्वेने या वर्षाच्या अखेरीस १२ वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू करण्याची योजना तयारी केली आहे. या सर्व वंदे भारत ट्रेनची बांधणी वेगाने सुरू आहे. खरे तर दुसऱ्या स्लीपर वंदे भारतची चाचणी पूर्ण झाली आहे. परंतु, ही दुसरी वंदे भारत स्लीपर ट्रेन नेमकी कोणत्या मार्गावर चालवली जाणार, याबाबत अद्याप तरी स्पष्टता नाही. यातच आता रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुंबईतून सुटणाऱ्या वंदे भारत ट्रेनला मंजुरी दिली आहे. याबाबत खासदारांनी रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. खासदारांनी केलेल्या या पाठपुराव्याला यश आले असून, नवीन वंदे भारत स्लीपर ट्रेन मंजूर केल्याचे पत्र रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदारांना दिले आहे.

बंगळुरू सेंट्रलचे खासदार पी. सी. मोहन यांनी मुंबई ते बंगळुरू मार्गावर स्लीपर वंदे भारत ट्रेन सुरू करण्यात यावी, या मागणीचा प्रस्ताव रेल्वेला पाठवला होता. या प्रस्तावाला भारतीय रेल्वे मंत्रालयाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, ही मागणी पूर्ण करण्यात आली आहे. जनसुविधेसाठी बेंगळुरू आणि मुंबई दरम्यान नवीन 'वंदे भारत स्लीपर' ट्रेन सुरू करण्याबाबत आपल्यात झालेल्या चर्चेचा कृपया संदर्भ घ्यावा. आपल्याला हे जाणून आनंद होईल की, KSR बेंगळुरू आणि मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) यांच्या दरम्यान नवीन 'वंदे भारत स्लीपर' ट्रेन सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे, असे पत्र अश्विनी वैष्णव यांनी पी. सी. मोहन यांना पाठवले आहे.

## २००० कोटींचा महाघोटाळा! ६.३ कोटी कॅश, ७.५ कोटींचे दागिने; १९ हजार लोकांना गंडा, ED ची मोठी कारवाई

**दिल्ली (दै. संध्या) :**

दिल्लीमध्ये ईडीने पुन्हा एकदा मोठी कारवाई करत रिअल इस्टेट क्षेत्रातील एका मोठ्या घोटाळ्याचा पर्दाफाश केला आहे. 'अर्थ इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' (EIL) आणि त्याच्याशी संबंधित कंपन्यांशी हे प्रकरण निगडित आहे. ईडीच्या दिल्ली विभागीय कार्यालयाच्या पथकाने १० एप्रिल २०२६ रोजी या प्रकरणी दिल्ली आणि गुरुग्राममधील १० ठिकाणांवर एकाच वेळी छापे टाकले. या कारवाईत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, दागिने, सोन्याच्या विटा आणि महागडी घड्याळं जप्त करण्यात आली आहेत. 'पीएमएलए' (PMLA) कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली असून ज्या ठिकाणी छापे टाकले गेले ती सर्व ठिकाणं 'अर्थ ग्रुप'चे संचालक आणि संबंधित संस्थांशी जोडलेली आहेत.

छापेमारीदरम्यान ईडीने सुमारे ६.३ कोटी रुपये रोख, ७.५ कोटी रुपयांचे दागिने, चांदीच्या विटा आणि महागडी घड्याळं जप्त केली आहेत. हे संपूर्ण प्रकरण मनी लॉन्ड्रिंगशी संबंधित असून, या प्रकरणाची सुरुवात दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने (EOW) नोंदवलेल्या पाच एफआयआरमुळे झाली होती. या तक्रारींमध्ये अर्थ इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि त्यांच्या संचालकांवर फसवणूक, गुन्हेगारी कट आणि विश्वासाचा भंग केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

सीरियस फ्रॉड इन्व्हेस्टिगेशन ऑफिसने (SFIO) देखील कंपनी कायद्याच्या कलम ४४७ अन्वये प्रवर्तक आणि संचालकांविरुद्ध गुन्हेगारी तक्रार नोंदवली आहे. तपासात असं समोर आलं आहे की, अर्थ ग्रुपने 'Earth' या ब्रँडच्या नावाखाली दिल्ली-एनसीआर, गुरुग्राम, ग्रेटर नोएडा आणि लखनौमध्ये अनेक मोठे रिअल इस्टेट प्रकल्प सुरू केले होते. यामध्ये अर्थ टाउन, अर्थ सफायर, अर्थ कोपिया, अर्थ टेकवन यांसारख्या अनेक प्रकल्पांचा समावेश होता. कंपनीने लोकांना आकर्षित करण्यासाठी मोठी आश्वासनं दिली होती, जसे की वेळेत फ्लॅट किंवा कमर्शियल युनिट देणं आणि गुंतवणुकीवर चांगला परतावा देणं. या आश्वासनांवर विश्वास ठेवून १९,४२५ हून अधिक लोकांनी आपल्या आयुष्याची कमाई यात गुंतवली.

## शेती महामंडळाच्या जमिनीबाबत राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई (दै. संध्या) :**

राज्य सरकारच्याशेती महामंडळाकडे असलेल्या ८० हजार एकर जमिनीपैकी ४२ हजार एकर जागा ही स्थानिक स्वराज्य संस्था, एमआयडीसी आणि अन्य सरकारी विभागांना मोफत दिल्यानंतर आता यापुढे या जमिनी मोफत न देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यापुढे रेडीरेकनरचे दर आकारून जमिनी देण्यात येणार आहेत.



राज्यात महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) कायदा म्हणजे सिलिंग ॲक्ट १९६१ मध्ये लागू झाल्यानंतर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी - राज्य सरकारने ताब्यात घेतल्या होत्या. - या जमिनींचे एकूण क्षेत्रफळ हे ८० हजार एकर इतके होते. गेल्या पाच-सहा दशकांत हळूहळू या जमिनी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांना मोफत देण्यात आल्या. मात्र, असेच मोफत वाटप करण्यात आले तर एक दिवस शेती महामंडळाकडे जमीनच नसेल आणि पैसाही नसेल, त्या परिस्थितीत महामंडळ बंद करावे लागेल, हे लक्षात आल्यानंतर या शेतजमिनी देताना निदान काही पैसा आकारला गेला पाहिजे हा विचार पुढे आला. त्यानुसार आता महसूल विभागाने त्याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

गावठाण हद्दीपासून पाच किमी परिसरातील शेती महामंडळाच्या जमिनी गावठाण विस्तार, घरकुल योजना, घनकचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठा यांसारख्या सार्वजनिक कामांसाठी ग्रामपंचायतींना विनामूल्य देण्यास परवानगी होती. या धोरणामुळे मोठ्या प्रमाणावर ग्रामपंचायतींना जमिनींचे वाटपही केले गेले. परिणामतः महामंडळाचे जमीन क्षेत्र झपाट्याने कमी झाले, महामंडळाला उत्पन्न काहीच मिळेना हे लक्षात घेऊन आता रेडीरेकनरनुसार दर आकारूनच जमिनी दिल्या जाणार आहेत. त्यामुळे शेती महामंडळाला उत्पन्न मिळेल, मोफत जमिनी मिळत असल्याने वारेमाप मागणी केली जायची त्याला पायबंद बसेल.

# अंबानींकडून जागतिक वन्यजीव पशुवैद्यक विद्यापीठाची घोषणा

## वनतारामध्ये पशुवैद्यकीय शिक्षणाला समर्पित आधुनिक काळातील गुरुकुलचा प्रारंभ

**जामनगर (दै. संध्या) :**

रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांनी स्थापन केलेल्या वनतारा या जागतिक वन्यजीव संरक्षक संघटनेने शुक्रवारी (दि. १०) एका ऐतिहासिक प्रकल्पाचीघोषणा केली आहे. गुजरातच्या जामनगरमध्येवनतारा विद्यापीठ सुरू होत असून, वन्यजीव संरक्षण आणि पशुवैद्यकशास्त्र या क्षेत्राला पूर्णपणे वाहिलेले हे पहिले एकात्मिक जागतिक विद्यापीठ असेल. विशिष्ट हेतूंसाठी निर्माण केलेल्या या आधुनिककाळातील गुरुकुलाचा उद्देश वन्यजीव आणि पशुवैद्यक शिक्षण या क्षेत्रात देशाला जगात प्रमुखस्थान मिळवून देणे हा आहे.

**शास्त्रीय संशोधन आणि भविष्यवेधी ध्येय :**

पशुकल्याण क्षेत्रातील शास्त्रीय संशोधन वाढवणे तसेच वन्यजीव संरक्षणाचे भवितव्य सुरक्षित करणे, ही या विद्यापीठाची उद्दिष्टे आहेत. पशुवैद्यक औषधे, वन्यजीव संरक्षण आणि वन्यजीवांचे संवर्धनया क्षेत्रात जागतिक दर्जाचे तज्ज्ञ निर्माण करणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे. या विद्यापीठाचे अभ्यासक्रम भारताच्या परंपरागत ज्ञानावर आधारित असतील.

यातून विशिष्ट हेतूंवर आधारित आणि भविष्यकाळासाठी सज्ज असलेले शिक्षणाचे एक आदर्श मॉडल तयार होईल. विद्यापीठाच्या ध्येयाबाबत बोलताना अनंत अंबानी म्हणाले की, आपण वन्यजीवांच्या सेवेसाठी सहानुभूती, ज्ञानआणि कौशल्य यांच्या साहाय्याने आपण आपले विचार तसेच संस्था कशा घडवतो, यावर पशुसंवर्धनाचे भविष्य अवलंबून राहील. हे विद्यापीठ वन्यजीवांना होणारा त्रास जवळून पाहून आणि आणि त्यांच्या निगराणीच्या क्षेत्रात मोठी उणीव असल्याच्या वैयक्तिक जाणिवेतून आकारास आले आहे.

**वैविध्यपूर्ण पायाभरणी आणि धार्मिक विधी :**

विद्यापीठाचा भूमिपूजन सोहळा हिंदू परंपरेनुसार झाला. यावेळी शिक्षणशास्त्र, वन्यजीव जतन या क्षेत्रांतील अनेक मान्यवरांसह अनंत अंबानी यांना घडवणारे शिक्षक आणि मार्गदर्शक आवर्जून उपस्थित होते. जल, माती आणि पाषाण यांची धार्मिक पद्धतीने स्थापना करून प्रतीकात्मक पायाभरणी करण्यात आली. विशेष म्हणजे, हा सर्व भाग भारताच्या विविध जैवविविधतेने समृद्ध असलेल्या



ठिकाणांहून आणला होता. यात उत्तर, दक्षिण, पूर्व,पश्चिम आणि मध्य भागातील गवताळ प्रदेश, जंगले, पाणथळ क्षेत्र, हिमालय आणि अन्य पर्वतरांगांमधील घटकांचा समावेश होता. ही संकल्पना देशाच्या समृद्ध नैसर्गिक वारशाच्यापायावर आधारित विद्यापीठ उभारण्याच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे.

**एकात्मिक शैक्षणिक परिसंस्था:**

बनतारा विद्यापीठ हे या क्षेत्रातील विविध विद्या शाखांचे एकाच शैक्षणिक परियंत्रणेत एकत्रीकरण करेल. यातील अभ्यासक्रम आजच्या जागतिक वन्यजीव संरक्षण व्यवस्थेशी निगडित असतील. बनताराच्या अनुभवाचा लाभ शैक्षणिकअभ्यासक्रमात आणि व्यावसायिक प्रशिक्षणातसमाविष्ट केला जाईल. प्राण्यांविषयीची दयाभावना,शास्त्र आणि जतन या बाबी एकत्रित करून तज्ज्ञव्यावसायिकांना वन्यजीव आणि त्यांच्यापरिसंस्थेच्या आरोग्याशी संबंधित आव्हानांवर मातकरण्यासाठी सज्ज केले जाईल.

**आधुनिकीकरण आणि भविष्याचा निर्धार:**

पशुसंवर्धनाचे भविष्य हे केवळ महाविद्यालयेआणि प्रयोगशाळांमध्येच नव्हे, तर माणसाच्यासद्सद्विवेक बुद्धीमध्ये आणि प्रत्यक्ष जंगलांमध्येनिर्माण होईल, हे ध्यानात घेऊन शिक्षणाचेआधुनिकीकरण करण्याचा विद्यापीठाचा निर्धारआहे. हे ठिकाण वन्यजीव आरोग्य आणि संवर्धन यांचे ज्ञानभंडार असलेले दीर्घकालीन व्यासपीठ म्हणून विकसित होईल. यावेळी वनतारा युनिव्हर्सिटी फाऊंडिंग फेलोज आणि एव्हरी लाईफ मॅटर्स या शिष्यवृत्त्यांची घोषणाही करण्यात आली.

ज्ञानाचा उपयोग केवळ प्रगतीसाठीच नव्हे, तर प्रत्येक जीवाच्या संरक्षणासाठी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. वनतारा विद्यापीठ हे निव्वळ शैक्षणिक व्यवस्था नसून, वन्यजीव संरक्षणासाठी सक्षम ज्ञानव्यवस्था आणि प्रशिक्षित मनुष्यबळनिर्माण करण्याचे एक जागतिक केंद्र ठरेल. वनतारा हा वन्यजीव सुरक्षा, पुनर्वसन आणिआरोग्य सेवेसाठी स्थापन केलेला विशेष उपक्रमआहे. आधुनिक पशुवैद्यक औषधशास्त्र, संगोपनआणि प्राणी जतनाचे नियोजन याद्वारे ही संस्था दुर्मीळ प्रजातींचे पुनर्स्थापना आणिवन्य जीवसृष्टीच्या संवर्धनात ख्यातनाम म्हणून नावा रूपाला येत आहे.

**नालंदाचा वारसा आणि ऋग्वेदाचा आदर्श:**

पुरातन नालंदा विद्यापीठाची मार्गदर्शक मूल्ये आणि ऋग्वेदातील 'आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः' (अर्थात, आदर्श विचार सर्व दिशांनी आपल्याकडे येऊ दे) या बोध वाक्यानुसार, प्रत्येक जीवाचे संरक्षण करणारी नवी पिढी तयार करण्यासाठी हे विद्यापीठ कटिबद्ध असेल. ही बोधतत्त्वे अधोरेखित करणारे दोन 'बिजोलिया पाषाण' विद्यापीठाच्या भूमिपूजन स्थळी उभारण्यात आले आहेत. पुरातन विध्यन संस्कृतीची परंपरा सांगणारे हे पाषाण भारताच्या ज्ञान आणि शिक्षणाच्या समृद्ध परंपरेचे प्रतीक आहेत.

**अभ्यासक्रम आणि शिष्यवृत्तीची तरतूद:**

विद्यापीठात पदवीपूर्व, पदव्युत्तर आणि विशेष अभ्यासक्रम राबवले जातील. यात प्रामुख्याने वन्यजीव औषधे आणि शस्त्रक्रिया, पोषण, वर्तणूकशास्त्र (Ethology), आनुवंशिकता, साथीचे रोग, आरोग्य संरक्षण धोरण आणि नैसर्गिक अधिवास निर्मिती यांचा समावेश असेल. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या निम्नस्तरातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्तीदेखील दिली जाईल. विद्यापीठात अत्याधुनिक शैक्षणिक आणि वैद्यकीय पायाभूत सुविधा, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि निवासी संकुल असेल, पशु संगोपन आणि आधुनिक पद्धतींना सक्षम करण्यासाठी कृती आधारित संशोधनावर (Action based Research) अधिक भर दिला जाईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सणासाठी महापालिका देणार अग्रिम रक्कम

पिंपरी (दैनिक संध्या) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सणासाठी आर्थिक स्वरुपात आगाऊ रक्कम म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अधिकारी कर्मचाऱ्यांना दरमहा हप्त्याने परतफेडीच्या अटीवर एकरक्कमी १५ हजार रुपये सण अग्रिम दिला जाणार आहे. याबाबतचा आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या सणाच्या निमित्ताने अधिकारी व कर्मचाऱ्यांना आर्थिक स्वरूपात आगाऊ रक्कम देण्याचा धोरणात्मक निर्णय स्थायी समिती आणि महापालिका सभेने यापूर्वीच मंजूर केला आहे. त्यानुसार प्रत्येकी १५ हजार रुपये अग्रिम अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाटप केला जाणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती हा सणासाठी महापालिका आस्थापनेवरील अधिकारी कर्मचाऱ्यांना एकरक्कमी आगाऊ रक्कम दिली जात असल्याचा हा निर्णय महत्त्वाचा समजला जातो. सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन ४८०० रुपयांपेक्षा कमी किंवा सातव्या वेतन आयोगानुसार पे लेव्हल एस-१७ (वेतन संरचना ४७,६०० - १,५१,१००) पेक्षा कमी असणाऱ्या पात्र सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना ऐच्छिक स्वरुपात या सण अग्रिमचा लाभ मिळणार आहे. सण अग्रिम म्हणून दिली जाणारी १५ हजार रुपयांची रक्कम सदर लाभ घेतलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वेतनातून मे २०२६ पासून दरमहा १५०० रुपयांप्रमाणे १० हप्त्यांमध्ये परतफेड केली जाणार आहे. ही सण अग्रिमाची रक्कम १४ एप्रिल २०२६ पूर्वी अदा करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### भ्रष्टाचाराची सीबीआय चौकशी करा; कामठे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार, नियमबाह्य कंत्राटे, बोगस निविदा प्रक्रिया व पदांचा गैरवापर केल्याच्या घटना समोर येत आहेत. आता तब्बल ५२ कोटी रुपयांचा घोटाळा लेखा विभागात झाला आहे. याची सीबीआय चौकशी करावी अशी मागणी माजी नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. ५२ कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी, कंत्राटदारांनी आणि सत्ताधारी भारतीय जनता पार्टीशी संबंधित काही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी संगनमत करून शासनाची व जनतेची फसवणूक केल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. या प्रकरणात केवळ कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करून वरिष्ठ अधिकारी, निर्णय घेणारे प्रशासकीय प्रमुख, संबंधित कंत्राटदार आणि भारतीय जनता पार्टीचे संबंधित पदाधिकारी यांना वाचविण्याचा प्रयत्न होत आहे. महापालिकेतील अनेक महत्त्वाच्या निविदा, विकासकामे आणि आर्थिक व्यवहारांमध्ये सत्ताधारी पक्षाशी संबंधित व्यक्तींना लाभ मिळाल्याचे आरोप वारंवार होत आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची, आमदार, माजी पदाधिकाऱ्यांची, संबंधित लोकप्रतिनिधींची तसेच महापालिका अधिकाऱ्यांची भूमिका तपासणे आवश्यक आहे. महापालिकेतील मागील पाच वर्षांतील सर्व प्रमुख आर्थिक व्यवहार, कंत्राटे, निविदा प्रक्रिया व नियुक्तत्यांची चौकशी करण्यात यावी. भाजपशी संबंधित स्थानिक पदाधिकारी, माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व त्यांच्या निकटवर्तीयांच्या भूमिकेची चौकशी करावी. दोषी अधिकारी, कंत्राटदार, राजकीय पदाधिकारी व संबंधित व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. करून कठोर कारवाई करण्यात यावी. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना व संबंधित सत्तारूढ पदाधिकारी यांना सर्व पदांवरून दूर करण्यात यावे, अशी मागणी तुषार कामठे यांनी केली आहे.

### अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष, कारवाईची 'टीप' देणे भोवले

पिंपरी (दैनिक संध्या) : अनधिकृत बांधकामांवरील कारवाईकडे दुर्लक्ष, अतिक्रमण कारवाईची गोपनीय माहिती लोकांना पुरविणे सहायक आयुक्त, कनिष्ठ अभियंता आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाला (बीट निरीक्षक) चांगलेच भोवले आहे. सहायक आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाला निलंबित केले असून दोघांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. अनधिकृत बांधकामांवरील कारवाईकडे दुर्लक्ष केल्याने 'ई' क्षेत्रीय अधिकारी असलेले सहायक आयुक्त तानाजी नरळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण कारवाईसाठी नरळे यांना प्राधिकृत केले आहे. परंतु, त्यांनी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण कारवाईकडे दुर्लक्ष केले. अनधिकृत बांधकामावरील कारवाई संदर्भात फेब्रुवारी २०२६ पासून दर महिन्याला आढावा बैठक घेण्यात येत आहे. 'ई' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील ५६२ अनधिकृत बांधकामांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. प्रत्यक्षात केवळ ८२ ठिकाणीच अतिक्रमण कारवाई करण्यात आली. ४८० बांधकामांना नोटीस देऊन कोणतीही कारवाई केली नाही. यातून कारवाईबाबतची उदासीनता दिसून येत आहे. अनधिकृत बांधकामावरील कारवाईचे, प्रस्तावित कारवाईचे विवरण सादर करणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष केले. ही बाब गंभीर स्वरूपाची असल्याचे निरीक्षण नोंदवून कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत नरळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. शिस्तभंग विषयक कारवाई का करण्यात येऊ नये? याचा लेखी खुलासा तीन दिवसांत सादर करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. कनिष्ठ अभियंता संदीप हजारे यांना निलंबित करून विभागीय चौकशी सुरू केली आहे. हजारे हे स्थापत्य मुख्य कार्यालयात कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याकडे 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणे, सर्वेक्षण करून अहवाल सादर करणे, अनधिकृत बांधकामांना नोटीस देणे, पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून कारवाई करण्याची जबाबदारी आहे. या हद्दीतील अनधिकृत बांधकामांवर एक एप्रिल रोजी सर्व साहित्य सामग्रीसह पोलीस बंदोबस्तमध्ये कारवाईचे नियोजन केले होते.

### पोलीस शिपाई भरतीत बनावट क्रीडा प्रमाणपत्रांचा प्रकार

पिंपरी (दैनिक संध्या) : पोलीस शिपाई भरती प्रक्रियेत बनावट क्रीडा प्रमाणपत्रे सादर केल्याचा गंभीर प्रकार समोर आल्याचा आरोप मानवी हक्क संरक्षण आणि जागृती संस्थेने केला आहे. या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी संस्थेने केली आहे. संस्थेच्या माहितीनुसार, १७ ऑक्टोबर २०२५ रोजी ३२२ जागांसाठी आणि ५ फेब्रुवारी २०२६ रोजी १४० वाढीव जागांसाठी भरती जाहिराती प्रसिद्ध झाल्या होत्या. या भरती अंतर्गत १५ मार्च २०२६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली असून सध्या कागदपत्र पडताळणी प्रक्रिया सुरू आहे. याच टप्प्यात काही उमेदवारांनी 'कुरास' (Kuras) या खेळासह इतर क्रीडा प्रकारांची बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याची माहिती संस्थेला मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. संस्थाध्यक्ष विकास कुचेकर यांनी सांगितले की, प्रत्यक्षात तालुका, जिल्हा किंवा विभागीय स्तरावर सहभाग नसतानाही काही जणांनी राज्यस्तरीय प्रमाणपत्रे मिळवून भरतीत सादर केली असल्यास हा प्रकार प्रामाणिक उमेदवारांच्या हक्कांवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेची पारदर्शकता आणि प्रशासनावरील विश्वास धोक्यात येत आहे.

शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांनी म्हटले की, पोलीस दलात प्रवेशासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करणे हा गंभीर गुन्हा असून प्रत्येक प्रमाणपत्राची संबंधित क्रीडा संघटना व अधिकृत नोंदींच्या आधारे काटेकोर पडताळणी करणे आवश्यक आहे.

# गुणवत्तेला प्राधान्य देत नवीन प्रशासकीय इमारतीचा प्रकल्प वेळेत पूर्ण करा – महापौर रवि लांडगे




**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत ही केवळ एक इमारत नसून नागरिकांना अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि आधुनिक सेवा देणारे केंद्र ठरणार आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता अबाधित राखत हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करावा. कोणतीही तडजोड न करता दर्जेदार काम व्हावे, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड येथील सायन्स पार्कजवळ उभारण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या सुरू असलेल्या कामकाजाची महापौर रवि लांडगे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. यावेळी प्रकल्पाच्या प्रगतीची माहिती घेत विविध कामांच्या गुणवत्तेबाबत तसेच प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

याप्रसंगी नगरसदस्या सुप्रिया चांदगुडे, अनुराधा गोरखे, नगरसदस्य कुशाग्र कदम, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता प्रेरणा सिनकर, अनिल भालसाखळे, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, बाळू लांडे यांच्यासह विनायक साठे, सुनील पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी कामाची गुणवत्ता अबाधित ठेवत प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांना अत्याधुनिक आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत ही शहराच्या वाढत्या गरजांचा विचार करून उभारली जात असून ती नागरिकांसाठी एक सक्षम, सुटसुटीत आणि तंत्रज्ञानाधारित सेवा केंद्र ठरणार आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांना विविध विभागांच्या सेवा एकाच छताखाली अधिक जलद, पारदर्शक आणि सोयीस्कर पद्धतीने उपलब्ध होतील. त्यामुळे कामाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता राखणे आणि निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने समन्वयाने काम करत कोणतीही तडजोड न करता दर्जेदार काम पूर्ण करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी इमारतीच्या कामकाजाबाबत माहिती देताना सांगितले की, नवीन इमारतीचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. गुणवत्ता, सुरक्षा आणि वेळेचे नियोजन या तिन्ही बाबींवर प्रशासनाचा विशेष भर आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने काम करत आहे.

मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी यावेळी नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाच्या प्रगतीबाबत सविस्तर माहिती दिली.

## विद्यार्थ्यांनी चौकटीबाहेरचा नाविन्यपूर्ण विचार करण्याची क्षमता विकसित करायला हवी - रामहरी कुटे

**पिंपरी (दै. संध्या)**

चौकटीबाहेरचा नाविन्यपूर्ण विचार करण्याची क्षमता आपल्याला उज्वल भविष्याकडे घेऊन जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते किंवा परीक्षेसाठी ज्ञानार्जन न करता त्याचा प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनात वापर करण्यासाठी प्रयत्नशील व्हायला हवे असे आवाहन स्कोडा ऑटो वोक्सवॅगन इंडिया प्रा. लि. कंपनीच्या कर्मचारी संबंध विभागाचे प्रमुख रामहरी कुटे यांनी केले.

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) च्या वतीने 'व्यवस्थापनातील नाविन्यता आणि माहिती तंत्रज्ञान' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना बोलत होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मलेशियाचे परदाना विद्यापीठ, नेपाळच्या पोखरा विद्यापीठाचे युनि ग्लोब कॉलेज, मलेशियाचे म्हासा विद्यापीठ, इंडो युरोपियन एज्युकेशन फाउंडेशन आणि मॉरीशसची मनुष्यबळ व्यवस्थापन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

वास्तव जगातील एखाद्या घटनेकडे तुम्ही कशाप्रकारे बघता, तुम्हाला अमुक एखादी घटना, प्रसंग समस्या वाटते का संधी वाटते हे केवळ तुमच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. म्हणजेच तुमचा दृष्टिकोन, विचार करण्याची पद्धत, नावीन्यपूर्ण पद्धतीने काम करण्याचे कौशल्य यामुळेच यशप्राप्ती होते,असे रामहरी कुटे यांनी यावेळी त्यांच्या मनोगतात संगितले.आपल्या प्रत्येकाला अनेक कल्पना सुचत असतात, मात्र आपण त्याकडे दुर्लक्ष करतो, आपल्याला जर खरेच काहीतरी भरीव कामगिरी करण्याची इच्छा असेल तर आपण आपल्याला सुचणाऱ्या कल्पनांची यादी लिहून ठेवण्याची सवय लावून घ्यायला हवी, सुचलेल्या कल्पनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवे, प्रसंगी अपयश आले तरीही हताश न होता सातत्याने त्या कल्पनेचा ध्यास घेऊन कृतीशील राहिल्यास निश्चित यशस्वी होता येते, तसेच प्रचंड वेगाने बदलणाऱ्या सध्याच्या जगात नाविन्यपूर्ण पद्धतींमध्येही सातत्याने बदल होत आहे, याबाबत विद्यार्थ्यांनी लक्ष ठेवून नावीन्यतेचा सातत्याने विचार करायला हवा असे रामहरी कुटे यांनी त्यांच्या मनोगतात सांगितले. तर परिषदेतील विद्यार्थ्यांना त्यांच्यातील संशोधकवृत्ती जोपासून केवळ शोधनिबंध प्रसिद्ध करण्यासाठी संशोधन मर्यादित न ठेवता वास्तव जगातील समस्या सोडविण्यासाठी, नवनिर्मितीसाठी करण्यासाठी संशोधन उपयोगात आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घयावा असे मत यशस्वी संस्थेचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी यांनी सांगितले.

## एम. ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्याचा विधी समितीचा ठराव

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजामध्ये मराठी भाषेचा शंभर टक्के वापर व्हावा, तसेच महापालिकेचा व्यवहार अधिक सोपा, सुटसुटीत आणि अर्थपूर्ण भाषेत व्हावा, या उद्देशाने एम.ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना दोन विशेष वेतनवाढ देण्याचा ठराव महापालिकेच्या विधी समितीच्या विशेष बैठकीत करण्यात आला आहे. हा ठराव अंतिम मंजुरीसाठी महापालिका सभेसमोर ठेवण्यात येणार आहे.


पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विधी समितीची बैठक सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, कुशाग्र कदम, वर्षा जगताप, तुषार सहाणे, कुंदा भिसे, शेखर चिंचवडे यांच्यासह महापालिका सहआयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त राजेश आगळे उपस्थित होते.

राजभाषा मराठीतून कामकाज अधिक सक्षम व परिणामकारकपणे करण्यासाठी महापालिकेच्या विविध विभागांमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. महापालिका स्तरावरील बहुतांश कामकाज आधीपासूनच मराठी भाषेत होत असून, कार्यालयीन व्यवहार, सरकारी दस्तऐवज आणि दैनंदिन कामकाजात मराठीचा अधिकाधिक वापर सुनिश्चित करण्यावर भर दिला जात आहे.

मराठी भाषा ज्ञान व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे, विज्ञान-तंत्रज्ञान, वैद्यक अशा विविध ज्ञानशाखांमधील उच्च शिक्षण मराठी माध्यमात उपलब्ध करून देणे, मराठी भाषेला नवतंत्रज्ञानाने सुसज्ज करणे, सर्वसामान्यांना समजेल अशी प्रशासकीय मराठी विकसित करणे तसेच बोली भाषांचे जतन व संवर्धन करणे, या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शासनामार्फत विविध शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. त्याच अनुषंगाने महापालिकेच्या विधी समितीने एम.ए. मराठी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना दोन विशेष वेतनवाढ देण्याचा ठराव केला आहे.

मराठी भाषेतील लेखन, अनुवाद आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढवण्यासाठी तसेच कार्यालयीन संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी प्रशासकीय संवर्गातील कर्मचाऱ्यांनी मराठी विषयामध्ये उच्च शिक्षण घेतल्यास महापालिकेच्या कामकाजात त्याचा अधिक परिणामकारक उपयोग होणार आहे. तसेच मराठी भाषेचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळावे, मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार-प्रसार व विकास साधावा, या दृष्टीनेदेखील हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

## महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह, विचार प्रबोधनपर्व २०२६ चे उद्‌घाटन




**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ११ ते १७ एप्रिल २०२७ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ (भीमसृष्टी) येथे सामाजिक समता सप्ताह आणि विचार प्रबोधन पर्व २०२६ चे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचे उद्धाटन शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. याशिवाय विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर मांडेकर, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे तसेच नगरसदस्य सिद्धार्थ बनसोडे, राहुल भोसले, कुशाग्र कदम, तुषार हिंगे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, डॉ. वैशाली घोडेकर (लोंढे), सारिका मासुळकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यांच्यासह विशेष अतिथी म्हणून डॉ. भीमराव आंबेडकर यांची उपस्थिती असणार आहे. तर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे तसेच नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांची देखील उपस्थिती लाभणार आहे.

प्रबोधनपर्वाच्या पहिल्या दिवसाची सुरूवात सकाळी १०.१५ वाजता शारदा मुंडे यांच्या 'मी जोतीबाची सावित्री' हा एकपात्री नाट्यप्रयोगाने होईल. त्यानंतर ११.३० वाजता शाहीर राजेंद्र कांबळे व सहकारी यांचा शाहिरी जलसा तर दुपारी १ वाजता साधना मेश्राम व मंजुषा शिंदे यांची गीत गायनाची मैफिल आयोजित करण्यात आली आहे. दुपारी २.३० वाजता थिएटर वर्कशॉप कंपनी प्रस्तुत महात्मा फुले लिखित 'तृतीय रत्न' हे नाटक सादर होणार आहे. सायंकाळी ४ वाजता काव्यभूमी संस्थेचा 'गाथा साऊ जोतीची..' हा कवितामय कार्यक्रम होणार असून सायंकाळी ५.३० वाजता 'महात्मा फुले यांना अभिप्रेत समाजव्यवस्था' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

यामध्ये ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे, अनुसूचित जाती जमाती आयोग, महाराष्ट्र राज्य सदस्य अ‍ॅड. गोरक्ष लोखंडे, मुंबई विद्यापीठाच्या प्रा. डॉ. वंदना महाजन, संविधान अभ्यासक नुरखा पठाण, दिल्ली सर्वोच्च न्यायालयाच्या अ‍ॅड. दिशा वाडेकर हे सहभागी होणार आहेत.

# "मास्टर"होण्यासाठी रियाज, सातत्य अत्यावश्यक

## आकृती प्रदर्शनात कांबळे यांना डी वाय पाटील जीवनगौरव पुरस्कार प्रदान



**आकुर्डी (दै. संध्या)**

कोणत्याही क्षेत्रात "मास्टर" होण्यासाठी "रियाज" आणि सातत्य,आणि एकाग्रता असणे अत्यावश्यक आहे.कला ही भावनेशी जोडलेली असल्याने स्वतःला झाकून काम केल्यास उत्तम कलाकृती निर्माण होते. असे सांगून तंत्रज्ञानाने किती ही प्रगती केली तरी नवनिर्मितीसाठी कौशल्याला कधीचं कोणताही पर्याय नाही व तसेच भविष्यातही नसेल.असे मत जेष्ठ शिल्पकार प्रमोद कांबळे यांनी व्यक्त केले.

आकुर्डीच्या डॉ डी वाय पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीतील स्कूल ऑफ अप्लाईड आर्ट अँड क्रॉफ्टसच्या वतीने भरविण्यात आलेल्या "आकृती" चित्र प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी प्रमोद कांबळे यांना डी वाय पाटील जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सत्काराला उत्तर देतांना ते बोलत होते.

५१ हजार रोख,मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.समारंभाला जाहिरात कलादिग्दर्शक महेश घरत, चित्रकार पराग बोरसे,कुलगुरू प्रा.मनिष भल्ला,मुख्य वित्तीय अधिकारी बिपीन शर्मा, कुलसचिव डॉ. बिरान मोईदीन, डॉ माधवी देशपांडे, डॉ अनुपमा पाटील, डॉ मधुरा जगताप, स्कूल ऑफ अप्लाइईड आर्टस् अँड क्रॉफ्टचे संचालक जयप्रकाश कलवले आदी मान्यवर उपस्थित होते.

स्कूल ऑफ अप्लाईड आर्ट अँड क्रॉफ्टस च्या २२५ हून अधिक उपयोजित कला विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे 'आकृती' प्रदर्शनाचे उद्‌घाटन कलादिग्दर्शक महेश घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कला प्रदर्शनामुळे विद्यापीठातील वातावरण उत्साहवर्धक व आल्हाददायक झाल्याचे सांगत कुलगुरू प्रा मनिष भल्ला यांनी विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे कौतुक करून प्रोत्साहन दिले.

डी वाय पाटील प्रतिष्ठान चे वित्त-लेखाधिकारी बिपीन शर्मा म्हणाले की, आज च्या घडीला कला हे नुसते सजावटीचे माध्यम राहिले नसून, सुसंवाद व प्रेरणादायी स्तोत्र ही ठरत आहे कारण कलेद्वारे असंख्य प्रश्न ही सहज सुटू शकतात हे सिद्ध झालेले आहे. यावेळी सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार यश शेवाळे याला देण्यात आला. वर्गनिहाय विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदर्शन समन्वयक डॉ नितीन तावरे, शरद वडकर, राजेश पुजारी, अध्यापक वृंद प्रा. शंकर आडेराव, डॉ. राहुल वेलदोडे प्रा. पल्लवी पांढरे, प्रा सुरभी गुळवेलकर, प्रा. कृष्णा सावंत, प्रा. श्याम पगारे, प्रा. विजया लक्ष्मी, प्रा संकेत भलारे, एम एल जगदाळे, अमेंद्र देशमुख, दर्शना गायकवाड, स्नेहल मगरे, अमोल हरगुडे, जगन्नाथ चौगुले व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

डी वाय पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या कलादालनात आकृती हे विद्यार्थ्यांच्या कलाकृतीं चे प्रदर्शन दि. ११ ते १८ एप्रिल पर्यंत स १० ते सायं ७ वाजेपर्यंत कला रसिकांसाठी विनामूल्य खुले असल्याची माहिती स्कूल ऑफ अप्लाइड आर्टस् अँड क्रॉफ्टचे संचालक जयप्रकाश कलवले यांनी दिली. सूत्रसंचालन कु. क्रिन्जल जैस्वाल केले तर आभार कु. सारथा राजकुवर यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### डॉ. दीपक शिकारपूर यांचे “सायबर सजगता” या विषयावर भाषण

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : राजगुरुनगर येथील प्रांजली सावंत हिने एम.पी.एस.सी.परीक्षेत इतर मागास वर्ग महिला प्रवर्ग गटात राज्यात प्रथम क्रमांकाचे उत्तुंग यश संपादन केले असून तिची कर सहायक या पदासाठी निवड झाली आहे. प्रांजली ही महात्मा गांधी विद्यालयाची सन २०१८ च्या एस.एस.सी बॅचची विद्यार्थीनी आहे. कोणत्याही प्रकारचा खासगी क्लास न लावता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत तिने हे यश संपादित केले आहे. प्रांजली म्हणाली की माझ्या या यशामध्ये खेड तालुका एज्युकेशन सोसायटी आणि महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे मोलाचे योगदान आहे. अभ्यासाची खरी आवड मला शालेय जीवनापासूनच निर्माण झाली. स्वयं अध्ययन व वेळेचे नियोजन यामुळेच मला हे यश संपादन करता आले. माझ्या या यशामध्ये माझी आई व भावाचे अविरत परिश्रम आहेत. प्रांजलीच्या यशाबद्दल खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष अजित लुणावत, मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी, सर्व संचालक मंडळ, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, प्राचार्या संध्या कांबळे, अधिकारी वर्ग, शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.



### सुनील राजवाडे यांना ‘उद्योग रत्न 2026’ पुरस्कार प्रदान

कोरेगावममुळ (दैनिक संध्या) : कुक्कुटपालन व्यवसायातील सातत्य, नाविन्यपूर्ण प्रयोग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल सुनील नरसिंग राजवाडे यांना या वर्षाचा मानाचा 'उद्योग रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुक्कुटपालन क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे. यशाची शौर्यगाथा गेल्या अनेक वर्षांपासून राजवाडे हे कुक्कुटपालन व्यवसायात कार्यरत आहेत. तसेच " mayur poultry and feed" या youtube channel द्वारे ते नवीन होतकरू आणि या व्यवसायात येऊ इच्छिणाऱ्या तरुणांना ते मार्गदर्शन करतात. त्यांनी पारंपरिक पद्धतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन या व्यवसायाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. कष्टाची तयारी आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले असून, आज अनेक तरुणांसाठी ते एक प्रेरणास्थान बनले आहेत. हा पुरस्कार त्यांना त्यांच्या व्यवसायातील पारदर्शकता, उच्च दर्जाची उत्पादकता आणि व्यवस्थापनातील उत्कृष्टतेसाठी प्रदान करण्यात आला आहे. शासनाचे विविध प्रतिनिधी आणि उद्योग क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या उपस्थितीत दिमाखदार सोहळ्यात इंटरनॅशनल पोलिस फोरम यू.एस.ऐ. तर्फे त्यांना सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव सुनील राजवाडे यांच्या या यशाबद्दल मित्रमंडळी, व्यावसायिक भागीदार आणि ग्रामस्थांकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले जात आहे. "हा पुरस्कार माझ्या कष्टाचे फळ नसून, माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान आहे. भविष्यात या क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान आणण्याचा माझा मानस आहे." सुनील नरसिंग राजवाडे यांनी बोलताना सांगितले.

### सायबर गुन्हेगारांचे जाळे – तीन घटना, एकच धडा : “विश्वास ठेवण्याआधी विचार करा!”

बारामती (दैनिक संध्या) : बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत अलीकडील काळात सायबर फसवणुकीच्या तीन गंभीर घटना उघडकीस आल्या असून, या तिन्ही घटनांमधून एक अत्यंत महत्त्वाचा धडा समोर आला आहे की, सायबर गुन्हेगार प्रथम नागरिकांचा विश्वास संपादन करतात आणि त्यानंतर विविध युक्त्या वापरून त्यांची आर्थिक फसवणूक करतात. घटना क्रमांक १ Digital Arrest Scam याघटनेमध्ये74वर्षीयज्येष्ठनागरिकमहिलेलात्यांच्यामोबाईलवरWhatsApp द्वारे व्हिडिओ कॉल करण्यात आला. त्या कॉलमध्ये समोर असलेल्या व्यक्तीने स्वतःला पोलीस अधिकारी असल्याचे भासवून पोलीस गणवेशात बोलणे केले. संबंधित इसमाने महिलेला त्यांच्या विरुद्ध अटक वॉरंट असल्याचे खोटे सांगितले व “डिजिटल अरेस्ट” होईल अशी भीती दाखवून मानसिक दबाव निर्माण केला. त्यामुळे महिलेला कोणाशीही संपर्क साधू नये, असे सांगण्यात आले आणि तपासाच्या नावाखाली त्यांचे पैसे सुरक्षित खात्यात जमा करण्यास सांगण्यात आले. या भीतीमुळे महिलांनी त्यांच्या Fixed Deposit (एफ.डी.) तोडून वेगवेगळ्या खात्यांवर पैसे ट्रान्सफर केले. अशा प्रकारे आरोपींनी त्यांच्याकडून एकूण ₹45,60,000/- रक्कम फसवणुकीने मिळवली.



### नगदवाडी केंद्र शाळेतील विद्यार्थ्यांना रायटिंग पॅडचे वाटप

नारायणगाव (दैनिक संध्या) : नगदवाडी ता. जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत कांदळी गावचे माजी आदर्श सरपंच बाळासाहेब बढे यांच्या पुढाकाराने शाळा व्यवस्थापन समिती व शाळा सल्लागार समितीच्या वतीने शाळेतील इयत्ता १ ली ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या सर्व १८० विद्यार्थ्यांना दर्जेदार व टिकाऊ अशा शालोपयोगी शैक्षणिक रायटिंग पॅडचे वाटप करण्यात आले अशी माहिती मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. या उपक्रमासाठी सर्व सदस्यांनी आर्थिक योगदान दिले.कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,शाळा सल्लागार समिती अध्यक्ष सुरेश बढे,सदस्य संगीता बढे,रघुनाथ बढे,दयानंद बढे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन केंद्रशाळेतील शिक्षक मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ,सुप्रिया अभंग,आशा आरेकर व उज्वला कांबळे यांनी केले.सामाजिक व शैक्षणिक उपक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो व विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होते.

# साखळाई सिंचन योजनेला मंजुरी; घोड धरणावरून विरोध

**निमोणे (दै. संध्या)**

गेल्या चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या साखळाई उपसा सिंचन योजनेला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अखेर मंत्रिमंडळाची मंजुरी मिळवून दिली आहे. विखे पाटील घराण्याच्या तीन पिढ्यांनी या प्रकल्पासाठी पाठपुरावा केला होता.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण भागात आपली पकड मजबूत करण्यासाठी विखे पाटलांनी 1 हजार 234 कोटी रुपये वर्ग करीत प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली आहे. मात्र, ज्या घोड धरणावरून ही योजना कार्यान्वित होणार आहे, त्या लाभक्षेत्रातून आता प्रचंड विरोधाचा सूर उमटत आहे.



चिंचणी येथील घोड धरणाची मूळ क्षमता 7.50 टीएमसी होती; मात्र गाळामुळे ती आता केवळ 5.50 टीएमसी उरली आहे. याच साठ्यातून साखळाई योजनेसाठी 1.8 टीएमसी शेतीसाठी आणि 0.20 टीएमसी पिण्यासाठी असे एकूण 2 टीएमसी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. घोड धरणावरून आधीच शिरूर शहर, रांजणगाव औद्योगिक वसाहत आणि अनेक गावांच्या जलजीवन योजना अवलंबून आहेत. उन्हाळ्यात धरणाची पातळी खालावल्याने टेलच्या भागाला पाणी पोहोचत नाही. अशा स्थितीत नवे आरक्षण दिल्यास लाभक्षेत्रात भीषण पाणीटंचाई निर्माण होईल, असा दावा अभ्यासकांनी केला आहे.

श्रीगोंदा आणि अहिल्यानगर तालुक्यातील 29 गावांना या योजनेचा लाभ होणार असून, श्रीगोंद्यातील म्हसे येथे पंपिंग हाऊस उभारले जाणार आहे.

विशेष म्हणजे, या भागातून कुकडीचा कालवा जात असताना आणि मोहरवाडी तलावातून हा प्रकल्प कमी खर्चात होणे शक्य असतानाही, विखे पाटलांनी भौगोलिकदृष्ट्या कठीण असलेल्या घोड धरणाचाच अट्टहास का धरला, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

**प्रकल्पाचे स्वरूप**

- **एकूण निधी :** 1 हजार 234 कोटी रुपये
- **लाभार्थी :** श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्यातील 29 गावे
- **टप्पे :** एकूण चार स्टेजमध्ये योजना कार्यान्वित होणार
- **भीती :** घोड लाभक्षेत्रातील शेती आणि उद्योगांचे पाणी धोक्यात
- **मागणी :** मूळ लाभधारकांच्या हक्काच्या पाण्यावर गदा न आणता पर्यायी मार्गाचा विचार व्हावा.

## भिगवणमध्ये भटक्या कुत्र्यांचा हल्ला; 12 वर्षीय मुलगी जखमी

**भिगवण (दै. संध्या)**

इंदापूर तालुक्यातील भिगवणमध्ये भटक्या कुत्र्यांच्या हैदोस सुरूच आहे. शुक्रवारी (दि. 9) प्रभाग 1 मध्ये एका बारा वर्षीय मुलीवर चार ते पाच भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला. एका कुत्र्याने तिचा चावा देखील घेतला. तेथील शाळकरी मुले व नागरिकांनी प्रसंगावधान राखत तिची कुत्र्यांच्या तावडीतून सुटका केली. धनश्री भोलाराम शेलार असे जखमी मुलीचे नाव असून, तिच्यावर भिगवण येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

या भागात आत्तापर्यंत जवळपास 42 जणांना भटक्या कुत्र्यांनी जखमी केले आहे. येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिकेत लोखंडे यांनी त्यास दुजोरा दिला आहे. यावरूनच भटक्या कुत्र्यांच्या उपद्रव दिसून येतो. भोलाराम शेलार यांनी दिलेल्या माहितीनुसार धनश्री ही सकाळी किराणा वस्तू आणण्यासाठी नऊ वाजण्याच्या सुमारास दुकानात गेली होती.

त्या वेळी तिथे कळपाने उभ्या असलेल्या कुत्र्यांनी तिच्यावर हल्ला केला. भीतीने ती धावत होती तरीही एका कुत्र्याने तिच्या पायाला चावा घेतला. त्या वेळी तेथे उपस्थित असलेल्यांनी प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला. या आधी देखील याच कुत्र्यांनी चार ते पाच जणांना चावा घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

# यात्रेचा निधी शाळेसाठी

## ‘एक गाव, एक यात्रा’ संकल्पातून शिक्षणाला प्राधान्य

**राहू (दै. संध्या)**

ग्रामदैवत काळभैरवनाथाच्या यात्रेनिमित्त होणारा कुस्त्यांचा आखाडा आणि ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम रद्द करून, त्यातून जमा होणारा लाखो रुपयांचा निधी जिल्हा परिषद शाळेच्या विकासासाठी वापरण्याचा स्तुत्य निर्णय वाळकी (ता. दौंड) ग्रामस्थांनी घेतला आहे. विशेष म्हणजे, वर्षानुवर्षे दोन गटांत विभागलेली यात्रा यंदा एकत्रितपणे साजरी होत आहे.




वाळकी गावामध्ये दरवर्षी दोन गटांच्या वतीने वेगवेगळ्या पद्धतीने यात्रा साजरी करण्याची परंपरा होती. मात्र, यंदा दोन्ही गटांतील प्रमुखांनी आणि ग्रामस्थांनी सामंजस्याची भूमिका घेतली.

गावच्या विकासासाठी आणि मुलांच्या भविष्यासाठी मतभेद बाजूला सारून “एक गाव, एक यात्रा” हा संकल्प केला.

यात्रेनिमित्त ऑर्केस्ट्रा, तमाशा आणि कुस्त्यांच्या आखाड्यावर मोठी उधळण केली जाते. मात्र, वाळकी ग्रामस्थांनी अनावश्यक खर्चाला फाटा दिला असे बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब थोरात, उत्तम थोरात यांनी सांगितले.

मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर होणारा खर्च आता शाळेच्या तिजोरीत जमा होईल. या निधीतून जिल्हा परिषद शाळेची दुरुस्ती, रंगरंगोटी, शैक्षणिक साहित्य आणि भौतिक सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत.

गावातील मुलांचे भविष्य ज्या शाळेत घडते, ती शाळा समृद्ध असावी, या उद्देशाने आम्ही हा निर्णय घेतला आहे, अशी भावना ग्राामस्थांनी व्यक्त केली. दोन गट एकत्र आल्याने गावातील सामाजिक सलोखा वाढणार आहे.

# शस्त्रक्रियेच्या मदती करता तरुणांचे योगदान आवश्यक - मंगेशभाऊ कांडगे

**चाकण (दै. संध्या)**

अत्यंत गरीब आणि निराधार नागरिकांच्या शस्त्रक्रियेच्या मदतीसाठी दानशूर मंडळींबरोबर आर्थिक मदत करण्याकरता तरुणांचे योगदान अत्यंत आवश्यक असल्याचे विचार चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक मंगेशभाऊ कांडगे यांनी व्यक्त केले.

येथील देवमाणूस स्व. राजेंद्र यशवंत वाडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सोलापूर, धुळे व लातूर या जिल्ह्यातील चार मुलांच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदतीचे प्रत्येकी बारा हजार रुपयांप्रमाणे चार धनादेश वाडेकर कुटुंबीयांच्या वतीने मंगेशभाऊ कांडगे यांच्या हस्ते निराधार लेकरांच्या पालकांकडे सुपूर्त करण्यात आले. त्यावेळी मंगेशभाऊ कांडगे बोलत होते. यावेळी चाकण पतसंस्थेचे संचालक गोरक्षनाथ कांडगे, उद्योजक अंकुश डोंगरे, प्रशांत गोलांडे, राजेंद्र शिंदे, हभप. शांताराम महाराज कानपिळे, ऋषिकेश वाडेकर आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मंगेश कांडगे पुढे म्हणाले," गरिबांच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया तातडीने होणे गरजेचे आहे. त्यासाठी लागणारा आर्थिक निधी उपलब्ध करून देण्याकरिता येथील दुर्गाई हृदय प्रतिष्ठान करित असलेले परिश्रम कौतुकास्पद आहे. दुर्गाई प्रतिष्ठानने आजपर्यंत अत्यंत गरिबांच्या हृदय शस्त्रक्रिया करण्यासाठी आर्थिक निधी उपलब्ध करून दिला आहे, त्यांचा इतरांनी आदर्श घेतला पाहिजे."

ऋषिकेश वाडेकर यांनी यावेळी सांगितले की," येथील देवमाणूस तथा स्व. राजेंद्र वाडेकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आम्ही दरवर्षी नवीन नवीन उपक्रम राबवतो. गरजू व निराधार नागरिकांना मदत व्हावी हाच आमचा त्यामागचा हेतू असतो." वरील मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

## चाकण नगरपरिषदेच्या सभेत विकासात्मक निर्णय

**चाकण (दै. संध्या)**

चाकण नगरपरिषदेची मासिक सर्वसाधारण सभा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेमध्ये शहराच्या विकासाला गती देणारे व नागरिकांच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण व विकासात्मक निर्णय घेण्यात आले.

चाकण नगरपरिषद हद्दीतील धार्मिक, आध्यात्मिक व शैक्षणिक मालमत्तांना शासन नियमांच्या अधीन राहून १०० टक्के करमाफी देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना पाठविण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच कर विभागाच्या अभय योजनेअंतर्गत मालमत्ता कर व ५० टक्के शास्तीची रक्कम भरलेल्या माल मत्ताधारकांची उर्वरित ५० टक्के शास्तीची रक्कम पुढील वर्षाच्या मालमत्ता करांमध्ये समायोजित करण्यास मान्यता देण्यात आली.

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला.

उघड्यावर कचरा टाकणाऱ्या ठिकाणांवर देखील सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. तसेच चाकण शहरातील कॉर्नर प्लॉट व मोकळ्या जागांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. यामुळे शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडणार आहे. चाकण शहरात सुसज्ज ‘नमो उद्यान’ विकसित करण्यास तसेच व्यापारी संकुल व बहुउद्देशीय सभागृह उभारण्यास मान्यता देण्यात आली. शहरातील भुयारी गटार योजनेला गती देण्याचा ठरावही यावेळी मंजूर करण्यात आला. चाकण शहराच्या शाश्वत विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा सर्व नगरसेवकांनी आवर्जून उल्लेख केला.

# "नाथ साहेबाच्या नावानं चांगभलं" श्री भैरवनाथ यात्रा उत्साहात

## ग्रामस्थांच्या वतीने महाभिषेक; पहाटे ४ वाजल्यापासूनच श्री.भैरवनाथ मंदिराचा गाभारा दर्शनासाठी खुला

**वाल्हे (दै. संध्या)**

पंचक्रोशीचे ग्रामदैवत असलेल्या श्री भैरवनाथ देवाची यात्रा उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडली.यावेळी उत्सवमूर्तींच्या दर्शनाबरोबरच आकाशाला गवसणी घालणाऱ्या मानाच्या कावडी व देवाच्या पालखीचे देखणे रूप पाहण्यासाठी भाविकांनी मंदिर परिसरात अलोट गर्दी केली होती.

चैत्र कृष्ण कालाष्टमी हा देवाच्या लग्न सोहळ्याचा मुख्य दिवस असल्याने पहाटे ४ वाजल्यापासूनच श्री.भैरवनाथ मंदिराचा गाभारा दर्शनासाठी खुला करण्यात आला होता. यावेळी उत्सवमूर्तींवर देवस्थानचे पुजारी सचिन आगलावे तसेच पुरोहित सचिन देशपांडे यांसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने महाभिषेक घालण्यात आला.या दरम्यान इतरही धार्मिक विधी देखील संपन्न झाले.



दुपारच्या कडक उन्हानंतर मानाच्या सर्वच कावडींच्या मिरवणुकीला प्रारंभ झाला. यावेळी देवप्रदक्षिणा झाल्यावर छबिन्याचा कार्यक्रम रंगला. त्यानंतर सायंकाळी मुहूर्तानुसार ठरलेल्या वेळेत श्री भैरवनाथ व देवी जोगेश्वरी यांचा लग्न सोहळा शाही थाटात व भक्तिमय वातावरणात पार पडला.यावेळी फटाक्यांच्या आतिषबाजीसह गुलालाची मुक्त उधळण करून भाविकांनी आनंदोत्सव देखील साजरा केला.

या लग्न सोहळ्यास भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संदेश शिर्के जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड उपसरपंच सागर भुजबळ भाजपचे सचिन लंबाते माजी सभापती गिरीश पवार माथाडी कामगार संघटनेचे निलेश पवार यांसह देवाचे मानकरी सालकरी तसेच यात्रा कमिटीच्या पदाधिकाऱ्यांसह हजारोंच्या संख्येने नाथ भक्तांनी हजेरी लावली होती.यावेळी नाथ “साहेबांच्या नावानं चांगभलं” च्या गजरात श्री भैरवनाथ देवाची यात्रा उत्साहात पार पडली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कडबनवाडीतील चिंकारा वनक्षेत्रात आगीचा विळखा; शेकडो हेक्टर वनक्षेत्र जळून खाक

शेळगाव (दैनिक संध्या) : चिंकारा अभयारण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या इंदापूर तालुक्यातील कडबनवाडी, रुई हद्दीमधील वनक्षेत्राला गुरुवारी (दि. ९) दुपारी तीनच्या सुमारास आग लागली. यामध्ये सुमारे शंभर हेक्टर वनक्षेत्र खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. या वनक्षेत्राला आग लावली की लागली, हा प्रश्न आता निर्माण झाला आहे. आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. आगीचा तांडव अत्यंत मोठा असल्याने त्या ठिकाणी असणाऱ्या हरीण, लांडगे यांसह इतर प्राण्यांचे आणि पशुंचे मोठे नुकसान झाले आहे. या आगीमुळे पक्ष्यांना आणि लहान प्राण्यांना आपली घरटी, निवारा गमवावा लागला आहे. या आगीमध्ये सरपटणारे प्राणी, टिटव्यांची पिल्ले यांची मोठी जीवितहानी झाली असल्याची देखील प्राथमिक माहिती मिळत आहे. कडक उन्हाळ्याच्या दिवसांमुळे वनक्षेत्रामध्ये गवत पूर्णपणे सुकून गेले होते. त्यात अज्ञात कारणाने आग लागली. वाऱ्याचा प्रचंड वेग यामुळे आग जास्त प्रमाणात पेटली. आगीची माहिती मिळाल्यानंतर पर्यावरण प्रेमी भजनदास पवार तसेच वनरक्षक, कडबनवाडी, रुई परिसरातील ग्रामस्थ आणि शेजारील शेतकऱ्यांनी धाव घेतली, तसेच आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळाल्यानंतर शुक्रवारी (दि. १०)सहायक वनसंरक्षक अतुल जैन यांनी पाहणी केली. भविष्यात असे प्रसंग घडू नयेत यासाठी उपाययोजना कराव्यात अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. कडबनवाडीचे वनक्षेत्र सुमारे ३५०० हेक्टर आहे. या वनक्षेत्रामध्ये प्रामुख्याने चिंकारा, तरस, ससा, कोल्हे, लांडगे, खोकड असे प्राणी, तसेच गरुड, सर्पमार गरुड, धावक, मळटिटवी, चंडोल, श्रृंगारी घुबड अशा विविध प्रजातीचे पक्षी आणि सरपटणारे प्राणी इथे आढळतात.




### महिलेचे व्हिडिओ चित्रीकरण; अखेर बुधवार पेठ प्रकरणात 'त्या' पत्रकारावर गुन्हा दाखल

पुणे (दैनिक संध्या) : बुधवार पेठ परिसरात एका महिलेचे अश्लील व्हिडिओ चित्रीकरण केल्याच्या गंभीर प्रकरणात एका वृत्तवाहिनीचा पत्रकार रोहन राजेंद्र कदम (वय २८, रा. गांधी चौक ता. पुरंदर वाल्हे) याच्यावर अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात पीडितेच्या तक्रारीवरून विनयभंगाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. संबंधित महिलेने याबाबत जबाब नोंदवला होता. स्टिंग ऑपरेशनच्या नावाखाली पत्रकार रोहन कदम याने महिलेच्या परवानगीशिवाय अश्लील स्वरूपाचे व्हिडिओ त्याच्या मोबाईलमध्ये चित्रीकरण केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर पीडित महिलेने पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी प्राथमिक चौकशी करत संबंधितावर गुन्हा नोंदवला आहे. रोहन कदम याच्यासह त्याच्यासोबत असलेल्या अन्य तीन जणांविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. चार दिवसांपूर्वी झालेल्या याप्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. अशा प्रकारच्या घटनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. सध्या पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, पुणे श्रमिक पत्रकार संघाने याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. याप्रकरणी त्या पत्रकारांवर गुन्हा दाखल करावा, कोणालाही पाठीशी घालू नये, अशा कृत्याचे आम्ही समर्थन करत नाही, अशी भूमिका पत्रकार संघाने घेतली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास विश्रामबाग पोलिसांकडून केला जात आहे.





### सीबीजी प्रकल्पामुळे आधुनिकीकरणाकडे भक्कम पाऊल

लातूर (दैनिक संध्या) : विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्यात 8 टीपीडी क्षमतेच्या म्हणजे आठ मेट्रिक टन प्रति दिवस कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाचा शुभारंभ राज्याचे माजी मंत्री तथा कारखान्याचे चेअरमन सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. मांजरा कारखान्यातून आता दररोज आठ मेट्रिक टन कॉम्प्रेस्ड बायोगॅस निर्मिती होणार असून सीबीजी प्रकल्पामुळे कारखान्याने आधुनिकीकरणाच्या दिशेने एक भक्कम पाऊल टाकले असल्याचे प्रतिपादन दिलीपराव देशमुख यांनी यावेळी केले. दिलीपराव देशमुख म्हणाले की, मांजरा कारखान्याने नेहमीच शेतकरी हिताला प्राधान्य दिले आहे. ऊसतोडणीचे 100 टक्के हार्वेस्टरद्वारे नियोजन करून कारखान्याने देशासमोर आदर्श निर्माण केला आहे. लोकनेते विलासराव देशमुख यांनी दिलेल्या विचारधारेचा मार्गदर्शक ठेवून मांजरा परिवाराची वाटचाल सुरू आहे. सीबीजी प्रकल्पामुळे कारखान्याने आधुनिकीकरणाच्या दिशेने एक भक्कम पाऊल टाकले असून, कामाच्या माध्यमातून विश्वास निर्माण करण्याचे कार्य आम्ही सातत्याने करत आहोत, असे सांगून भविष्यात अधिकपणे चांगलं काम करण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोकराव काळे यांनी प्रास्ताविकात चालू गळीत हंगामाची सविस्तर माहिती दिली.

# भूकंपाच्या धक्क्याने नांदेड हादरला; ४.७ रिश्टर स्केल

- परिसर हदरल्याने भीतीने नागरिक घराबाहेर
- पशु ओरडत व जागीच उड्या घेत असल्याचेही दिसून आले

नांदेड (दै. संध्या)




### केंद्रबिंदू हिंगोलीत

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भूकंपमापक यंत्रावर ४.७ रिश्टर स्केलची झाली नोंद**

शनिवारी सकाळी पावणे नऊ वाजेच्या सुमारास बसलेले भूकंपाचे धक्के तीव्र स्वरूपाचे होते. भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील पांगरा शिंदे ता. वसमत परिसर होता. परिसरातील दीडशे किलोमीटर पर्यंत त्याचा परिणाम जाणवला. स्थितीवर जिल्हा प्रशासन लक्ष ठेवून असून नागरिकांनी घाबरू नये. पुन्हा धक्के जाणवल्यास सुरक्षित स्थळी थांबावे अन्यथा शक्य असल्यास मोकळ्या जागी बाहेर पडावे, असे आवाहन केले आहे.


नांदेड शहरासह जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये शनिवारी सकाळी पावणे नऊ वाजेच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. 15 ते 20 सेकंद जाणवलेल्या या हादऱ्यांनी भिंतीवरील आरसे व अन्य साहित्य हलताना दिसल्याचे अनेकांनी सांगितले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भूकंपमापक यंत्रावर त्याची नोंद झाली आहे. हा धक्का 4.7 रिश्टर स्केल असल्याची माहिती या विभागाचे प्रा. टी. विजयकुमार यांनी दिली.

नांदेड शहरातील मालेगाव रोड, श्रीनगर, काबरा नगर, वेदांत नगर, विजयनगर, सिडको- हडको आदीसह संबंध शहरात कमी अधिक प्रमाणात भूकंपाची तीव्रता नांदेडकरांनी अनुभवली. नांदेड जिल्ह्यातील हदगाव, हिमायतनगर, लोहा, अर्धापूर तालुक्यातही भूकंप जाणवल्याच्या प्रतिक्रिया समाज माध्यमावर व्हायरल झाल्या आहेत.

शेजारील वसमत तालुक्यात भूकंपाच्या धक्क्याने सेल्फमधील भांडी पडल्याचे वृत्त आहे. तसेच पूर्ण परिसरातही भूकंप तीव्रतेने जाणवला. परिसर हदरल्याने भीतीने नागरिक घराबाहेर धावत सुटले. विशेषतः पशु ओरडत व जागीच उड्या घेत असल्याचेही दिसून आले.

## RTE ची २५ टक्के प्रवेश सोडत जाहीर! ११ ते २० एप्रिलदरम्यान प्रवेश निश्चितीचे आवाहन

मुंबई (दै. संध्या)




| आरटीई प्रवेशासाठी निवड | |
|---|---|
| पुणे | १७,७२८ |
| ठाणे | १०,५७८ |
| नागपूर | ६,९९२ |
| नाशिक | ५,३२६ |
| मुंबई | ४,९४१ |
| रायगड | ४,३४५ |
| जळगाव | ३,३४० |
| पालघर | ३,१८३ |

आरटीई २००९ नुसार वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के ऑनलाइन प्रवेशाची सोडत ६ एप्रिल २०२६ रोजी काढण्यात आली असून निवड यादी जाहीर करण्यात आली आहे. ११ ते २० एप्रिलदरम्यान प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

राज्यात ८,७०१ पात्र शाळांमधील १,१४,८२६ रिक्त जागांसाठी एकूण २,८९,३८५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यानुसार दिव्यांग संवर्गातून ५८२ आणि सर्वसाधारण गटातून १,०५,२२९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. तसेच प्रतीक्षा यादीत दिव्यांग ३० व सर्वसाधारण ८६,००४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना १० एप्रिल पासून नोंदणीकृत मोबाईलवर राष्ट्रीय माहिती केंद्रामार्फत संदेश पाठविण्यात येणार आहेत. मात्र, केवळ संदेशावर अवलंबून न राहता पालकांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन निवड तपासावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सोडतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा प्रशासन अधिकाऱ्यांकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी. पडताळणीनंतर प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्र देण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यभरात एकूण १,०५,८११ अर्जांना प्रवेशासाठी निवड मिळाली आहे. मुंबईत एकूण ३२५ शाळांमधून ४,९४१ विद्यार्थ्यांच्या अर्जांची निवड करण्यात आली आहे. ११ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना संदेश पाठविण्यात येणार आहेत.

## कोट्यवधींचा चुराडा

## राज्यातील २३६४ 'मोटर ॲम्ब्युलन्स' प्रकल्प धूळखात !

- ट्रॅफिक आणि अरुंद गल्ल्यांमध्ये तातडीने पोहोचण्यासाठी राज्य सरकारने मोठ्या थाटामाटात सुरू केलेला 'मोटर ॲम्ब्युलन्स' प्रकल्प आता पूर्णपणे कोलमडला आहे.

अमरावती (दै. संध्या)

ट्रॅफिक आणि अरुंद गल्ल्यांमध्ये तातडीने पोहोचण्यासाठी राज्य सरकारने मोठ्या थाटामाटात सुरू केलेला 'मोटर ॲम्ब्युलन्स' प्रकल्प आता पूर्णपणे कोलमडला आहे. २०१८ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या एकूण २,३६४ मोटर रुग्णवाहिकांपैकी आज राज्यात एकही कार्यान्वित नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या महागड्या बुलेट रुग्णवाहिका नेमक्या गेल्या कुठे आणि त्या भंगारात कशा निघाल्या, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

मुंबईसारख्या गर्दीच्या -शहरात आणि ग्रामीण भागातील दुर्गम रस्त्यांवर मोठी रुग्णवाहिका वेळेत पोहोचू शकत नाही. यावर उपाय म्हणून राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई अंतर्गत तत्कालीन ईएमएस प्रकल्प संचालक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली २०१८ मध्ये हा प्रकल्प राबवण्यात आला. या खास 'बुलेट ॲम्ब्युलन्स' तयार करून त्या चालवण्यासाठी बीव्हीजी इंडिया, पुणे या संस्थेला देण्यात आल्या होत्या. प्रत्येक मोटर रुग्णवाहिकेवर एक डॉक्टर आणि एक चालक अशा दोन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

२०१८ नंतर या धक्कादायक बाब म्हणजे, रुग्णवाहिकांचे काय झाले, त्या सध्या कोणत्या स्थितीत आहेत आणि त्यांचा सांगाडा कुठे पडला आहे, याची साधी विचारणाही आरोग्य विभागाने केलेली नाही. जनतेच्या करातून जमा आलेला पैसा अशा प्रकारे नियोजनशून्य कारभारामुळे व्यर्थ गेल्याने संताप व्यक्त होत आहे.




## संतापजनक! मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा आठवीच्या पुस्तकातून NCERT ने वगळला

सातारा (दै. संध्या)

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (NCERT) इयत्ता आठवीच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा काढून टाकण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत खेदजनक आणि निषेधार्ह आहे. मराठा साम्राज्य हा केवळ इतिहास नाही, तर तो आपल्या स्वाभिमानाचा, पराक्रमाचा



आणि राष्ट्ररक्षणाच्या तेजस्वी परंपरेचा जिवंत वारसा आहे. या निर्णयाविरोधात कायदेशीर पावले उचलणार असल्याचा इशारा वृषालीराजे भोसले यांनी दिला आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, छत्रपती शाहू महाराजांच्या काळात मराठा साम्राज्याने दिल्लीच्या राजकारणावर आपली पकड घट्ट केली होती. मराठ्यांचा पराक्रम केवळ सह्याद्रीपुरता मर्यादित न राहता थेट अटकेपार पोहचला होता. राजस्थानातील रामपुरा मोहीम, बुंदीतील राजकीय हस्तक्षेप, कक्कोरचे घनघोर युद्ध आणि पाटण, तसेच मेर्टा येथील ऐतिहासिक विजय हे मराठ्यांच्या अजेय युद्धनीतीचे पुरावे आहेत. अनेक राजपूत राज्यांनी त्यावेळी मराठ्यांचे वर्चस्व मान्य केले होते. ही ऐतिहासिक वस्तूस्थिती असतानाही मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा वस्तुस्थिती असतानाही मराठा अभ्यासक्रमातून हटवणे म्हणजे जाणीवपूर्वक इतिहास पुसण्याचा प्रयत्न असल्याची टीका होत आहे.

# महाराष्ट्रात का आवळला जातोय 'बोलीभाषे'चा गळा ?

## 'युनेस्को'च्या अहवालाने धक्कादायक वास्तव समोर; शैक्षणिक धोरणातील आणखी काही गंभीर उणिवा चव्हाट्यावर

- महाराष्ट्रात मात्र अभिजात मराठी आणि स्थानिक बोली यांच्यातील दरी रुंदावत चालली आहे
- ओडिशाने २१ आदिवासी बोलीभाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार केली
- युनेस्कोच्या मते, मूल्यमापन मात्र आजही प्रमाण भाषेत
- मराठीसह ११ भाषांना अभिजात दर्जा आहे

नागपूर (दै. संध्या)



### काय बदल हवे आहेत?

शाळांच्या पाट्या मराठीत करून किंवा कागदी परिपत्रके काढून मातृभाषा धोरण यशस्वी होणार नाही. त्यासाठी 'लोकल टू ग्लोबल' संकल्पना राबविण्यासाठी पाठ्यपुस्तकांत स्थानिक संदर्भ आणि बोलीभाषेतील शब्दांचा सन्मानाने समावेश हवा. प्राथमिक स्तरावर मुलांच्या स्वतःच्या भाषेत उत्तर देण्याचे स्वातंत्र्य असावे. ओडिशाच्या धर्तीवर राज्यात भाषिक आराखडा तयार करायला हवा. "महाराष्ट्राने 'अभिजात' दर्जाच्या भिंती नक्कीच बांधाव्यात, पण त्याआधी बोलींच्या भक्कम पायावर उभ्या असलेल्या ग्रामीण पोरांचा गळा घोटणे थांबवावे. पाया कच्चा ठेवून शिखरावर सोन्याचा कळस चढवू नये."

मराठी भाषेला 'अभिजात' दर्जा मिळाल्याने राज्याचा गौरव वाढला असला तरी 'युनेस्को'च्या ताज्या अहवालाने महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणातील आणखी काही गंभीर उणिवा चव्हाट्यावर आणल्या आहेत. तमिळ, तेलुगू, कन्नड आणि ओडिशासारखी राज्ये आपल्या मातृभाषेचे जतन करण्यासाठी शिक्षणात जे प्रयोग करत आहेत, त्या तुलनेत महाराष्ट्रात मात्र अभिजात मराठी आणि स्थानिक बोली यांच्यातील दरी रुंदावत चालली आहे. यावर अहवालाने नेमके बोट ठेवले आहे.

अहवालात ओडिशा राज्याचा विशेष गौरव करण्यात आला आहे. ओडिशाने २१ आदिवासी बोलीभाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. तिथे मुलांना बोलीभाषेतूनच प्राथमिक शिक्षण दिले जाते. महाराष्ट्रातही ६० हून अधिक समृद्ध बोलीभाषा श्वास घेत आहेत. सध्या देशात मराठीसह ११ भाषांना अभिजात दर्जा आहे. मात्र, युनेस्कोच्या मते, मूल्यमापन मात्र आजही प्रमाण भाषेतनच होते.

### तंत्रज्ञानाचा 'सावत्र' व्यवहार

निपुण' कार्यक्रमांतर्गत मुलांना त्यांच्या बोलीभाषेसह स्वीकारणे किती आवश्यक आहे, हे यंत्रणेला समजले असले तरी अंमलबजावणीत मोठा अडथळा आहे. या चाचण्या मोबाइल ॲपवर होतात. मुले भाषा आणि गणिताची उत्तरे त्यांच्या स्थानिक बोलीतील उच्चारणांनुसार देतात; मात्र ॲपला केवळ प्रमाण मराठीत उत्तर अपेक्षित असल्याने उत्तर योग्य असूनही 'अल्गोरिदम' त्यांना चूक ठरवते. महाराष्ट्रात वऱ्हाडी, खानदेशी, मराठवाडी, कोल्हापुरी, पुणेरी, नागपुरी अशा वैविध्यपूर्ण बोली आहेत. पोटबोलींची संख्या तीनशेवर आहे. बोलीभाषेचे इतके वैविध्य देशात इतरत्र कुठेही नाही. दुर्दैवाने, महाराष्ट्रातच बोलींशी असा सावत्र व्यवहार सुरू आहे.

### धोरण चकाचक, अंमलबजावणी पोकळ !

मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याच्या उत्सवात मश्गूल असलेल्या धोरणकर्त्यांना युनेस्कोने आरसाच दाखवला आहे. राज्यात निर्माण झालेली डिजिटल विषमता भयंकर असून, डिजिटल साधनांमध्ये स्थानिक बोलींचा समावेश नसल्याने ७० टक्के ग्रामीण विद्यार्थी मुख्य प्रवाहाच्या मागे फेकले गेले आहेत. तामिळनाडू आणि कर्नाटकसारखी राज्ये आपल्या शिक्षकांना बोलीभाषेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देत असताना महाराष्ट्र मात्र शिक्षकांना या भाषिक युद्धात कोणत्याही प्रशिक्षणाविना उतरवत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आळंदीत आरोग्य शिबिर

आळंदी (दैनिक संध्या) : आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आळंदी येथे आरोग्यविषयक लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात आला. आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य शिबिरात नागरिकांची मोफत तपासणी, तज्ज्ञांकडून सल्ला आणि आवश्यक उपचार सेवा देण्यात आल्या. या शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे समाजातील आरोग्यविषयक जाणीवा वृद्धिंगत होण्यास मदत होते, असे नमूद केले. शिबिराच्या आयोजनात आरोग्य अधिक्षक डॉ. उर्मिला शिंदे, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, पूजा घुंडरे, नगरसेवक सागर कुऱ्हाडे तसेच इतर नगरसेवक-नगरसेविका यांचा सहभाग होता. याच अनुषंगाने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपणाचा उपक्रमही राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अशा उपक्रमांमुळे वाढदिवस साजरा करण्याला विधायक स्वरूप प्राप्त होत असल्याचे मत नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी व्यक्त करण्यात आले.

### जयहिंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळवला प्रथम क्रमांक

नारायणगाव (दैनिक संध्या) : कुरण (ता. जुन्नर ) येथील जयहिंद कॉलेज ऑफ इंजीनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड विद्यार्थ्यांनी टेलीकम्युनिकेशन विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'ए आयवर आधारित जामीन गणना प्रणाली' या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला असून या गटामध्ये मानव मलिक, आर्यन परदेशी, अनुज नायकोडी व ओंकार कुडाळे यांचा समावेश होता.अशी माहिती प्राचार्य डॉ. अमोल उबाळे यांनी दिली.कार्यक्रमाचे उदघाट्न आयई टीई पुणेचे सचिव डॉ. डी. एस. मंत्री संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ यांच्या हस्ते झाले. द्वितीय क्रमांकासाठी दोन प्रकल्पांची निवड करण्यात आली. यामध्ये जयहिंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वैष्णवी शिंदे,आयुष शिंदे व निशांत शिंदे यांच्या 'डॉक्टर अपॉइंटमेंट प्रणाली' तसेच अथर्व थोरात व तेजस जाधव समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालय बेल्हे यांनी सादर केलेल्या लोड शेडिंग माहिती संकेतस्थळ या प्रकल्पांना विभागून देण्यात आले. तृतीय क्रमांकासाठी दोन प्रकल्प निवडण्यात आले.जयहिंद अभियांत्रिकीच्या मृणाली कनीटकर,गजानन सदाफळ व रितेश घाटेकर यांनी सादर केलेल्या मानवी पाऊलांद्वारे वीज निर्मिती तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथमेश मदाने, लखन पगारे,ऋषिकेश रासकर व प्रथमेश भोंडवे यांच्या ग्रेव्हो या प्रकल्पाला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ,संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे,शैक्षणिक समन्वयक व विभाग प्रमुख डॉ.वैशाली धेंडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.स्वप्नाली शिंदे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन मृणाली कानीटकर आणि पायल आभाळे यांनी केले. आभार शैक्षणिक समन्वयक व विभाग प्रमुख वैशाली धेंडे यांनी मानले.

### महात्मा फुले यांच्या जयंती दिनी शहर जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे भावपूर्ण आदरांजली

पुणे (दैनिक संध्या) : क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज समता भूमी व काँग्रेस भवन येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी सपकाळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मा. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, "सामाजिक क्रांतीची मशाल पेटवणारे, सत्यशोधक चळवळीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्ताने आज सामाजिक क्रांतीच्या या महामेरूला विनम्र आदरांजली अर्पण करतो." यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष व माजी मंत्री रमेश बागवे, मोहन जोशी, सरचिटणीस भानुदास माळी, माजी आमदार दिप्ती चवधरी, शहर उपाध्यक्ष अजित दरेकर, प्राची दुधाने, नगरसेवक प्रशांत जगताप, गटनेते चंदूशेठ कदम, रफिक शेख, अविनाश बागवे, गोपाळ तिवारी, मेहबुब नदाफ, अमिर शेख, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, लता राजगुरू, सुनिल मलके, कैलास गायकवाड, सुनिल पंडित, चेतन अगरवाल, राज अंबिके, द. स. पोळेकर, ओ.बी.सी. अध्यक्ष प्रदिप परदेशी, सिमा सावंत, सुंदर ओव्हाळ, अनिता धिमधिमे, प्रियंका मधाळे आदी उपस्थित होते.

### पाईट येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : शासनाच्या विविध योजनाचा लाभ नागरिकांना होत असून,शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी प्रशासनाने काम करावे असे आवाहन आमदार बाबाजी काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर दरम्यान केले.शासन आपल्या दारी या संकल्प अंतर्गत खेड तालुक्यातील करंजविहिरे व पाईट मंडळ भागातील गावांतील नागरिकांसाठी संयुक्त शिबीराचे आयोजन पाईट येथील सोमनाथ मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आले होते.प्रांत अधिकारी अनिल दौंडे व तहसिलदार प्रशांत बेडसे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात शासकीय विभागांच्या प्रमुख योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे अनुषंगाने शासन आपल्या दारी हा संकल्प ठेवून पाईट येथे वेगवेगळे विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. शिबीराच्या माध्यमातून शासकीय योजनांचा लाभ पंचक्रोशीतील नागरिकांना देण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शिबिराचे उद्घाटन आमदार बाबाजीशेठ काळे यांचे हस्ते करण्यात आले . यावेळी पंचायत समिती सभापती श्रीमती विद्याताई मोहिते व जिल्हा परिषद सदस्या सुनिताताई बुट्टे पाटील, तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील, महसूल नायब तहसिलदार राम बिजे, निवडणूक नायब तहसीलदार मनिषा खैरे, सहाय्यक गट विकास अधिकारी भोईर साहेब, पाईट मंडळाचे मंडळ अधिकारी मनिषा सुतार, करंजविहिरे मंडळाचे मंडळ अधिकारी राजेंद्र वडणे तसेच विविध विभागाचे अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते. करंजविहिरे व पाईट मंडळ अधिकारी व अधिनस्त ग्राम महसूल अधिकारी यांनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केले होते. या दरम्यान महसूल विभागाच्या तसेच इतर ई फेरफार प्रणाली अंतर्गत एकूण 127 फेरफार निर्गत करण्यात आले. व सर्व प्रलंबित फेरफार निर्गत करून नागरिकांना ५३२ सात बारा, व २१३ आठ (अ) करण्यात आले. तसेच कलम१५५ अंतर्गत एकूण ५ अर्ज प्राप्त झाले. असून २६ कुटुंबांना रेशन कार्ड वाटप करण्यात आले. तसेच पीएम किसान अंतर्गत 25 लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. संजय गांधी निराधार योजनेचे ११५ व श्रावणबाळ योजनेचे 33 लाभार्थी यांना लाभ मंजूर प्रमाणपत्र तसेच शालेय विद्यार्थ्यांना डोमासाईल सर्टिफिकेट-112 उत्पन्नाचे दाखले-२७९, रहिवासी दाखले -५ असे एकूण ५४४ दाखले मान्यवरांचे हस्ते वाटप करण्यात आले.

# शहरी जमिनींच्या नोंदीत मोठा बदल! सातबारा आणि मिळकतपत्रिका वेगळी करण्याचे आदेश

## गोंधळ दूर करण्यासाठी महसूल विभागाची मोहीम; तपासणी व वर्गीकरणाला वेग

पुणे (दै. संध्या)

राज्यातील शहरी भागांमधील मिळकतींची तपासणी करून शेतीक्षेत्र असलेल्या जागांना सातबारा उतारा, तर रहिवासी भागाला मिळकत पत्रिका देण्याची कार्यवाही करावी, असे आदेश महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी भूमी अभिलेख विभागाला दिले.

भूमी अभिलेख विभागाच्या विविध योजनांचा आढावा खारगे यांनी शुक्रवारी घेतला. त्यात सातबारा संगणकीकरण, ई पोस्ट, ई फेरफार, स्वामित्व, नक्शा, ई मोजणी, फेरफार यांचा समावेश




आहे. या वेळी जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल, प्रभारी अतिरिक्त जमाबंदी आयुक्त विकास गजरे, उपसंचालक कमलाकर हट्टेकर, विष्णू शिंदे, हेमंत निकम, जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक प्रभाकर मुसळे तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते. बैठकीत खारगे यांनी ई पीक पाहणी प्रकल्पाचा आढावा घेतला. त्यात खरीप रब्बी हंगामातील पीक पाहणीचे प्रमाण वाढवण्यासंदर्भात आदेश दिले. यासंदर्भात कार्यपद्धती निश्चित करण्याचेही त्यांनी सांगितले. राज्यातील अनेक शहरांमध्ये भूमापन हद्दीत सातबारा उतारा तसेच मिळकत पत्रिका दोन्ही अस्तित्वात आहेत. त्यामुळे अनेक विभागांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे.

हा गोंधळ दूर करण्यासाठी राज्यातील नगर भूमापन हद्दीतील मिळकतींची तपासणी करण्याचे आदेश खारगे यांनी दिले. ज्या ठिकाणी शेतीक्षेत्र कायम आहे, अशा ठिकाणी सातबारा उतारा कायम ठेवून मिळकत पत्रिका रद्द करण्यात यावी, तर ज्या ठिकाणी रहिवासी क्षेत्र आहे अशा ठिकाणी केवळ मिळकतपत्रिका कायम ठेवावे जेणेकरून नागरिकांना अडचणी निर्माण होणार नाहीत, असे त्यांनी सुचविले.

**द्रुतगती मोजणी तीस दिवसांच्या आत करा !**

भूमी अभिलेख विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध सुविधांमध्ये अर्थात सातबारा उतारा, फेरफार, ई रेकॉर्ड, ई मोजणी या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ब्लॉकचेन या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे त्यांनी सुचविले. राज्यभरातील मोजणींचा ही त्यांनी यावेळी आढावा घेतला. नियमित मोजण्या 90 दिवसांच्या आत पूर्ण करून द्रुतगती मोजणी तीस दिवसांच्या आतच कराव्यात, अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी केल्या.

**30 नोव्हेंबरपर्यंत चालणार**

स्वामित्व योजना राज्यभरात सुरू असून त्यानुसार ग्रामीण भागात मिळकत पत्रिका देण्यात येत आहेत. हा प्रकल्प येत्या 30 एप्रिलपर्यंत पूर्ण करावा. नक्शा प्रकल्पांतर्गत राज्यातील 10 नगरपालिकांमधील मिळकतींना पत्रिका देण्याचे काम सुरू आहे, ते देखील येत्या 30 एप्रिलपर्यंत पूर्ण करावे. केंद्र सरकारच्या विविध प्रकल्पांची कामे 30 नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावे. राज्यात सुरू असलेल्या पोटहिस्सा मोजणीचा पथदर्शी प्रकल्प 30 जूनपर्यंत करण्याचेही त्यांनी सुचविले.

## महात्मा फुले यांना द्विशताब्दी जयंती वर्षातच 'भारतरत्न' मिळावा : खा. वाघमारे



पुणे (दै. संध्या)

"क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' मरणोत्तर प्रदान करण्यात यावा, यासाठी केंद्र सरकारकडे विशेष आग्रह धरला जाईल," अशी ग्वाही खासदार ज्योती वाघमारे यांनी आज येथे दिली.

महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित अभिवादन सभेत त्या बोलत होत्या. या प्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार वाघमारे यांनी गायलेल्या गीताने जिंकली मने या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे खासदार ज्योती वाघमारे यांनी स्वतः महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारित एक प्रेरणादायी गीत सादर केले. त्यांच्या सुश्राव्य आवाजातील या गीताने उपस्थित सर्वांची मने जिंकली आणि सभागृहात चैतन्य निर्माण झाले. लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी सांभाळतानाच कलेच्या माध्यमातून त्यांनी व्यक्त केलेल्या आदरांजलीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पुण्यात साजरी होणार देशातील सर्वात मोठी जयंती कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली. ते म्हणाले की, "पुणे ही महात्मा फुलेंची कर्मभूमी आहे. त्यामुळे पुढील वर्षी महात्मा फुले यांची देशातील सर्वात मोठी आणि भव्य जयंती पुणे शहरात साजरी केली जाईल. महापालिकेच्या माध्यमातून यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल."

द्विशताब्दी महोत्सव समितीचे मुख्य निमंत्रक राहुल डंबाळे यांनी समितीच्या आगामी रूपरेषेबद्दल माहिती दिली. "महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी समितीच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाला सोलापूर येथील सामाजिक कार्यकर्ते विश्वास गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते अंजूम इनामदार, शिवसेनेचे मिलिंद आहिरे, विठ्ठल गायकवाड, अशोक दिलपाक, राहुल नागटिळक यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा जागर करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## जुन्नर तालुक्यात बाजरीचे पीक फुलोऱ्यात

नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यातील नारायणगाव, वारूळवाडी, आळेफाटा, ओतूर परिसरातील गावांमध्ये बाजरी पीक हे फुलोऱ्यात आले असून जोमाने वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हिवाळ्यात थंड वातावरणाबरोबर मार्च महिन्यात पडलेल्या हलक्या सरींमुळे बाजरी पिकाला अनुकरण वातावरण मिळाले आहे. त्यामुळे शेतामंध्ये सगळीकडे हिरवीगार दाट आणि उभी असलेली बाजरी दिसून येत आहे. सध्या बाजरी पीक हे कणसे तयार होण्याच्या टप्प्यात असल्याने शेतकरी त्या पिकाला खत, पाण्याचे नियोजन आणि किडीवर नियंत्रण आणण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करत आहेत.

शेतकरी सांगत आहेत की, सध्या बाजरीला 32 ते 34 रुपये प्रतिकिलो दर मिळत असून यावर्षी हा दर 40 रुपयांपर्यंत जाऊ शकतो. यावर्षी बाजरी पिकाला अनुकूल वातावरण मिळाले तर शेतकऱ्यांना बाजरीचे पीक हे चांगले मिळणार आहे. त्यामुळे शेतकरी हे बाजरी पिकाला किडी, रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पिकाची निगा राखत आहेत.

## शिरूर तालुक्यात ११०० कोटींच्या सिंचन योजनेला गती

शिक्रापूर (दै. संध्या)



शिरूर तालुक्यातील पाबळ-केंदूर परिसरातील बारा गावांसाठी 1100 कोटीच्या सिंचन योजनेला गती मिळाली आहे. याबाबत सिंचन भवन पुणे येथे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची शुक्रवारी (दि. 10) आढावा बैठक पार पडली.

या योजनेसाठी माजी जिल्हा परिषद सदस्य जयश्री पलांडे व शेखर पांचुदकर यांनी पाठपुरावा केला. ही बैठक आमदार राहुल कुल यांच्या विशेष प्रयत्नातून आयोजित केली होती. जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री विखे पाटील यांनी या भागातील योजना मार्गी लावणार असल्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार या बैठकीत विविध अडचणी दूर करून अधिकाऱ्यांना विविध प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

या वेळी या प्रकल्पासाठी 1.14 टीएमसी पाणी उपलब्धतेबाबत प्रस्ताव सादर केला. यास 30 मेपर्यंत मंजुरी मिळणे अपेक्षित आहे. या योजनेअंतर्गत एकूण 12 गावे लाभार्थी ठरणार आहेत. सुमारे 1000 मिमी व्यासाची पाइपलाइन उभारण्यात येणार असून, प्रकल्पाचा अंदाजित खर्च 100 कोटी रुपये आहे. बॅरेज डिझाइनचे काम तातडीने सुरू करण्याचे तसेच कन्सल्टंटच्या तातडीने नियुक्तीचे निर्देश दिले.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर परिसरातील पाणीटंचाई कमी होऊन शेती व पिण्याच्या पाण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. या बैठकीस अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, मुख्य अभियंता ए. के. धुमाळ, जिल्हा परिषद सदस्या स्वाती पाचुंदकर, माजी जिल्हा परिषद सदस्या जयश्री पलांडे, शेखर पाचुंदकर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अशोकराव पलांडे, सतीश पाचंगे, समरजित गायकवाड आदी उपस्थित होते. मेअखेरपर्यंत लिफ्ट इरिगेशन सिस्टिम (एलआयएस) साठी जनरल लेआउट व बॅरेज लेआउट तयार करणे अपेक्षित आहे. प्रकल्पाचे अंदाजपत्रक व 30 जूनपर्यंत प्रशासकीय प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. 30 मेपर्यंत पाणीपुरवठा डिझाइन पूर्ण करण्याचे आदेश दिले.

## पाबळवाडी येथे जेष्ठ नागरिकावर हल्ला

सावरगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील पाबळवाडी सावरगाव येथील बाजीराव पाबळे (वय 64) यांनी ऋषिकेश काळूराम भगत (राहणार खानापूर) याला काही पैसे दिले होते. त्या बदल्यात ऋषिकेश भगत याने पाबळे यांना चेक स्वरूपात पैसे दिले होते. त्यानंतर पाबळे यांनी मिळालेले चेक हे बँकेत टाकले व ते चेक बाऊन्स झाले.त्यावेळी पाबळे यांनी न्यायालयात भगत याच्यावर खटला दाखल केला होता. त्या रागातून भगतने पाबळे यांच्यावर चाकूने हल्ला करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर जुन्नर पोलिसांनी ऋषिकेश भगत याला अटक केली असून त्याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाजीराव पाबळे हे गुरुवार दि. 9 एप्रिल रोजी सायंकाळी दुचाकीवरून दूध आणण्यासाठी जात असताना भगतने त्यांच्यावर दगड फेकला.दगड हा डोक्याला लागल्याने पाबळे थांबले असता आरोपी भगत याने पुन्हा दगड मारून त्यांना जखमी केले आणि स्वतः जवळील चाकू काढून गंभीर वार केले.

# भीमाशंकर मंदिर बंद कालावधी वाढला; भाविकांची नाराजी

## विकासकामे अपूर्ण; 31 मेपर्यंत बंद, किमान मुखदर्शनाची मागणी जोरात

मंचर (दै. संध्या)

श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर येथील सुरू असलेल्या विकासकामांमुळे मंदिर बंद ठेवण्याचा कालावधी वाढविण्यात आल्याने भाविकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. आधी 3 महिन्यांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता कामे अपूर्ण असल्यामुळे पावणेदोन महिने मुदतवाढ देत 31 मेपर्यंत मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी किमान मुखदर्शन सुरू करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर



भीमाशंकर येथे होणारी गर्दी, भाविकांची सुरक्षितता तसेच जून महिन्यातील संभाव्य पावसाचे प्रमाण लक्षात घेऊन 9 जानेवारी ते 9 एप्रिल या कालावधीत मंदिर बंद ठेवण्यात आले होते. मात्र, विकासकामे अद्याप पूर्ण न झाल्याने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मंदिर 31 मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सूर्यकांत कुंभार यांनी दिलेल्या माहितीनुसार, सभामंडपाचे सुमारे 75 टक्के काम पूर्ण झाले असून, घुमटाचे काम सुरू आहे. तसेच मंदिराकडे जाणाऱ्या पायरीमार्गाचे कामही प्रगतीपथावर असल्याने सध्या भाविकांसाठी प्रवेशमार्ग बंद ठेविण्यात आला आहे.

जूनच्या पहिल्या आठवड्यात पावसाळा सुरू होण्याची शक्यता असल्याने त्यापूर्वी ही कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, मंदिर बंद राहण्याच्या निर्णयामुळे स्थानिक हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. देशभरातील भाविकांनी आधीच बुकिंग केले होते; मात्र कालावधी वाढल्याने आरक्षणे रद्द करावी लागली.

मंदिरातील सभामंडप व दर्शन रांगेचे काम पूर्ण होईपर्यंत किमान मुखदर्शनाची सुविधा सुरू करावी, अशी मागणी कायदेशीर सल्लागार सूर्यकांत बाबा धायबर, भीमाशंकर हॉटेल अँड रिसॉर्ट असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण बांगर, उपाध्यक्ष अशोक लोहकरे, सचिव बाबाजी निघोट, सदस्य संतोष बोऱ्हाडे, कमलेश वळसे पाटील यांच्यासह हॉटेल व्यावसायिकांनी केली आहे.